follow us : /rajdandlive

मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

www.rajdand.com । पश्चिम महाराष्ट्र ।



'बिग बॉस फेम' अभिजीत बिचुकले यांचा अर्ज दाखल
वृत्त पान ५ वर...

RNI Regd. No. 72105/99 ⁘ वर्ष २५ ⁘ अंक २२३ ⁘ सातारा ⁘ रविवार, दि. २१ एप्रिल २०२४ ⁘ पाने ६ (सुप्रभात) ⁘ किंमत ५/– रूपये

# उद्धव ठाकरे भ्रमिष्ठ, मला नाही त्यांना वेड लागलंय!

## आदित्य ठाकरेंना मुख्यमंत्री करण्याच्या दाव्यावर फडणवीसांचा हल्लाबोल

**अमरावती : शिवसेना आणि भाजपमध्ये मुख्यमंत्रीपदाबाबत २०१९ सालच्या विधानसभेच्या निवडणुकीआधी नेमकी काय चर्चा झाली होती यावरील राजकारण अजूनही सुरूच आहे. आदित्य ठाकरेंना मुख्यमंत्रीपदासाठी तयार करतो आणि मी दिल्लीत जातो, असे देवेंद्र फडणवीसांनी म्हटल्याचा दावा उद्धव ठाकरेंनी एका मुलाखतीत केला होता त्याला देवेंद्र फडणवीसांनी प्रत्युत्तर देत उद्धव ठाकरे यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. तर ठाकरेंचा दावा खोडून काढला.**





उद्धव ठाकरेंनी केलेल्या दाव्यावर बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाल की, उद्धव ठाकरे भ्रमिष्ठ झालेत. त्यांना वेड लागलंय, मला नाही. कालपर्यंत ते वेगळ्याच भ्रमात होते. कालपर्यंत म्हणत होते की अमित शहांनी त्यांना कुठल्यातरी खोलीत नेऊन मुख्यमंत्री करण्याचा शब्द दिला होता. आता त्यांचा भ्रम बदलला. आता म्हणतात की देवेंद्र फडणवीसांनी आदित्यला मुख्यमंत्री करतो असा शब्द दिला. उद्धव ठाकरेंनी नेमकं ठरवावं त्यांना नेमका कोणं व कोणता शब्द दिला होता.

आदित्य ठाकरेंना मुख्यमंत्रिपदासाठी तयार करतो आणि मी स्वतः दिल्लीच्या राजकारणात जातो असं देवेंद्र फडणवीस मला म्हणाले होते, असा दावा उद्धव ठाकरेंनी केला आहे. इंडियन एक्सप्रेस या इंग्रजी वृत्तपत्राला दिलेल्या मुलाखतीत त्यांनी हे वक्तव्य केलंय. देवेंद्र फडणवीस आदित्य ठाकरे यांना मुख्यमंत्रीपदासाठी मार्गदर्शन करणार होते असा दावा उद्धव ठाकरे यांनी केला आहे. अमित शहा भाजपचे अध्यक्ष झाल्यापासून भाजपचा सूर बदलला असंही उद्धव म्हणाले.

तुम्ही देश पाहा, आम्ही महाराष्ट्र पाहतो असं बाळासाहेब म्हणाले होते. तेव्हापासून भाजप आणि आमच्यात चांगलं सुरू होतं. २०१२ मध्ये माझ्या वडिलांचं निधन झाल्यावर मोदी घरी आले होते. २०१४ मध्ये मोदी पीएम झाले तेव्हा वाटलं, आपलं स्वप्न पूर्ण झालं. पण अमित शाह अध्यक्ष बनल्यावर भाजपचा सूर बदलला. भाजपच्या बोलण्यात मग्रुरी दिसत होती. बाळासाहेब गेले, वार करण्याची हीच वेळ आहे असं भाजपला वाटलं. वापरा आणि फेकून द्या हे भाजपचं धोरण आहे. माझ्यासोबत त्यांनी हेच करण्याचा प्रयत्न केला.

### निवडणुकीच्या कामकाजात टाळाटाळ

# सहा कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई प्रस्तावित

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** लोकसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या कामकाजात टाळाटाळ केल्याप्रकरणी खडकवासला विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून नियुक्त सहा कर्मचाऱ्यांवर निलंबनाची कारवाई प्रस्तावित करण्याचे निर्देश देण्यात आले आहेत, अशी माहिती खडकवासला विधानसभा मतदारसंघाचे सहायक निवडणूक निर्णय अधिकारी संजय आसवले यांनी दिली आहे.

पुणे महानगरपालिकेच्या कै. ह. तू. थोरवे प्राथमिक विद्यालय शाळा क्र. १६२ बी व विद्या निकेतन १९ चंद्रभागनगर कात्रज या शाळेतील शिक्षकांना निवडणूक कामकाजाकरीता मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून आदेश बजावण्यात आले होते. या कर्मचाऱ्यांनी वारंवार संधी देऊनही त्यांना नियुक्त केलेल्या भागाचे मतदान केंद्रस्तरीय अधिकारी म्हणून आपले निवडणूक कर्तव्य पार पाडण्यात अक्षम्य दुर्लक्ष, कुचराई, दिरंगाई केल्याच्या कारणास्तव त्यांच्याविरुद्ध लोकप्रतिनिधीत्व अधिनियम १९५० कलम ३२ अन्वये निलंबनाची कारवाई प्रस्तावित करावी, असे निर्देश पुणे महानगरपालिकेच्या शिक्षणाधिकाऱ्यांना देण्यात आले आहेत.

# सांगलीसाठी कोयनेतून विसर्ग वाढवला; धरणात ४३ टीएमटी पाणीसाठा शिल्लक

**पाटण/प्रतिनिधी**

एप्रिल महिन्यातच सांगली जिल्ह्यात पाणी टंचाईची समस्या निर्माण झाल्यामुळे येथील सिंचनासाठी पाण्याची मागणी वाढली आहे. त्यामुळे कोयना धरणातून विसर्ग वाढविण्यात आला असून विमोचक द्वारमधून आता १२०० क्यूसेकने पाणी सोडण्यात येत आहे. त्यामुळे सांगलीसाठी आता पायथा वीजगृह आणि विमोचक द्वार असा मिळून ३ हजार ३०० क्यूसेकने विसर्ग सुरू झाला आहे. तर धरणात सध्या ४३ टीएमसी इतकाच पाणीसाठा शिल्लक राहिला आहे.

सुमारे १०५.२५ टीएमसी इतकी पाणी साठवण क्षमता असलेल्या कोयना धरणातील पाण्यावर मोठ्या प्रमाणात वीजनिर्मिती केली जाते. वीज निर्मितीबरोबरच सिंचन आणि पिण्याच्या पाणी योजनांसाठीही धरणातून पाणी सोडले जाते. यामध्ये सांगली जिल्ह्याती अधिक करुन सिंचन पाणी योजनांचा समावेश आहे. गेल्यावर्षी सातारा जिल्ह्यात अपुरे



पर्जन्यमान झाल्यामुळे कोयना धरण पाणलोट क्षेत्रातही पावसाचे प्रमाण कमी राहिले. परिणामी कोयना धरण भरले नव्हते.

कोयना धरणातील पाणीसाठा ९५ टीएमसीपर्यंतच गेल्यामुळे गेल्यावर्षी नोव्हेंबर महिन्यापासून सांगली जिल्ह्यातील सिंचनासाठी पाण्याची मागणी होत होती. मागणी आणि तरतुदीनुसार सांगलीसाठी पाणी सोडण्यात येत आहे. मागील ५ महिन्यांपासून हे पाणी सांगलीकडून जसजशी मागणी केली जाईल तसतसे सोडले जात आहे. दरम्यान, सांगली पाटबंधारे विभागाकडून सिंचनासाठी कोयनेतून पाणी सोडण्याची वारंवार मागणी केली जात असल्यामुळे शनिवारी सकाळी ९ वाजता धरणाच्या विमोचक द्वारमधील विसर्ग ९०० वरुन १२०० क्यूसेकपर्यंत वाढविण्यात आलेला आहे. तसेच धरणाच्या पायथा वीजगृहाची दोन्ही युनिट सुरू आहेत. त्यामधूनही २१०० क्यूसेक विसर्ग सुरूच आहे. त्यामुळे सध्या सांगली जिल्ह्यातील सिंचनासाठी ३ हजार ३०० क्यूसेक पाणी विसर्ग होत आहे. हे सर्व कोयना नदीतून पुढे जात आहे.

### कोयना धरणात ४०.७९ टक्के पाणीसाठा

**दरम्यान, कोयना धरणात शनिवारी सकाळच्या सुमारास ४२.९३ टीएमसी पाणीसाठा होता. अजुनही कोयना धरणात ४०.७९ टक्के पाणीसाठा शिल्लक आहे. दि. १ जूनपर्यंत कोयना धरणातील पाण्याचे नियोजन करावे लागणार आहे.**

# साताऱ्यात 'मोदी गॅरंटी' चालणार नाही

- आमदार शशिकांत शिंदे यांचे कराडमध्ये वक्तव्य
- भाजपाच्या कोर कमिटीने उमेदवार बदलण्याचा अहवाल दिला होता.



**राजदंड / सातारा**

सातारा जिल्ह्यात मोदीची गॅरंटी चालेल का? या प्रश्नावर महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले की, इथे देशाची गॅरंटी चालते. देशाची ओळख झाली पाहिजे. व्यक्तीची झाली नाही पाहिजे. आणि भारत हा भारतच आहे. सह्याद्री नेहमी हिमालयाला मदतीला धावून जातो. यावेळी सुद्धा महाराष्ट्राचा हा इतिहास सह्याद्रीच्या साक्षीने निश्चितपण दिल्लीमध्ये पाहायला मिळेल, असा विश्वासही शशिकांत शिंदे यांनी ठामपणे व्यक्त केला.

कराड येथे आज विविध मान्यवरांच्या गाठीभेटी महाविकास आघाडीचे उमेदवार शशिकांत शिंदे यांनी घेतल्या. माजी नगराध्यक्ष जयवंतराव पाटील यांच्या निवासस्थानी ते माध्यमांशी बोलत होते.

यावेळी आमदार बाळासाहेब पाटील, शिवसेना(उद्धव बाळासाहेब ठाकरे) जिल्हाप्रमुख हर्षद कदम, समन्वयक इंद्रजीत गुजर माजी उपनगराध्यक्ष सुभाष डुबल, जशराज पाटील, अरुण पाटील, जय सूर्यवंशी, सुरेश पाटील, शिवराज इंगवले, महेश कांबळे, बाळासाहेब मोहिते उपस्थित होते.

सातारा जिल्ह्यामध्ये नरेंद्र मोदी प्रचारासाठी येणार आहे. यावर बोलताना शशिकांत शिंदे म्हणाले, निवडणुका लोकांनी हातात घेतल्या आहेत. अशा प्रकारचे चित्र जिथे जातो तिथे पाहायला मिळते. त्यामुळे कोणी आले तरी त्याचा फरक पडणार नाही. मी फिरताना पाहतोय राज्यात महायुतीबाबत नाराजी असल्याचे दिसत आहे. भाजपाच्या कोर कमिटीने उमेदवार बदलावा अशा प्रकारचा रिपोर्ट दिला होता. कोअर कमिटीने उमेदवाराबाबत काहीतरी विचार केला होता. परंतु उमेदवार कोणीही असला किंवा बदलला तरी त्याच्या बदलाची जी नाराजी आहे, त्यामुळे काही फरक पडणार नाही.

भ्रष्टाचार आरोपांबाबत शशिकांत शिंदे म्हणाले, मला वाटते की आता त्यांच्यावर फार भाष्य करण्याची गरज वाटत नाही. कारण एकदा खुलासा दिल्यानंतर त्यांच्याकडे दुसरा मुद्दा नाही. मी आताही पुरावे देऊ शकतो. कोण कुठे संपर्क करतो. कोण कोणावर दबाव टाकतो. माझे आवाहन आहे की, उद्या नवी मुंबईमध्ये जायचं शशिकांत शिंदेबाबत विचारायचे एका माणसाने मी चुकीचा आहे. असे सांगितले. तर मी निवडणूक लढणार नाही. लोकांना बदल पाहिजे. यातच सगळं उत्तर येते. माथाडी कामगार नेहमी पवार साहेबांच्या आणि माझ्या विचारच्या पाठीमागे उभा राहील असा विश्वास आहे, असे शशिकांत शिंदे यांनी सांगितले.

# कराड शहरातील हौसिंग सोसायटीमध्ये घरफोडी करणारे चोरटे जेरबंद

## ४२ लाखांचा मुद्देमाल जप्त : स्थानिक गुन्हे शाखा सातारा व कराड शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेची कामागिरी

**राजदंड / सातारा**

कराड शहरात असणाऱ्या शिवाजीनगर हौसिंग सोसायटी येथे चोरी करणाऱ्या दोघा चोरट्यांना स्थानिक गुन्हे शाखा सातारा व कराड शहर गुन्हे प्रकटीकरण शाखेने सातारा येथून ताब्यात घेतले. त्यांच्याकडून घरफोडीचे तीन गुन्हे उघड करून ५२ तोळे वजनाचे सोन्याचे दागिने व एक चारचाकी वाहन असा एकूण ४२ लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

या प्रकरणी रमेश महादेव कुंभार (रा. कशेळी, ता. भिवंडी, जि. ठाणे) व निलेश शामराव गाढवे (रा. बनवडी, ता. कोरेगाव, जि. सातारा)



अशी पोलिसांनी अटक केलेल्या दोघा चोरट्यांची नावे आहेत.

या घटनेची सातारा पोलिसांनी दिलेली माहिती अशी, कराडातील शिवाजीनगर हौसिंग सोसायटी येथे पंधरा दिवसांपूर्वी चोरट्यांनी घराची खिडकी उचकटून, खिडकीचे गज कापून आत प्रवेश केला. त्यानंतर घरातील ३८ लाख रूपये किमतीचे सोन्या-चांदीचे दागिने पोबारा केला होता. या चोरीची कराड शहर पोलिस ठाण्यात फिर्याद देण्यात आली होती.

या चोरीचे गांभीर्य लक्षात घेऊन पोलीस अधीक्षक समीर शेख, अप्पर पोलीस अधीक्षक आंचल दलाल, डीवायएसपी अमोल ठाकूर यांनी घटनास्थळी भेट देऊन स्थानिक गुन्हे शाखा साताराचे पोलीस निरीक्षक अरुण देवकर व वरिष्ठ पोलीस निरीक्षक कोंडीराम पाटील यांना या गुन्ह्यातील अज्ञात आरोपींबाबत माहिती प्राप्त करून गुन्हा उघड करण्याच्या सूचना दिल्या होत्या. त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेतील सहाय्यक पोलीस निरीक्षक पृथ्वीराज ताटे, रोहित फार्णे, पोलीस उपनिरीक्षक अमित पाटील व गुन्हे प्रकटीकरण शाखा कराडचे पोलीस उपनिरीक्षक पतंग पाटील यांच्या अधिपत्याखाली एक पथक तयार करून गुन्हा उघडकीस आणण्याच्या सूचना दिल्या होत्या.

तपास पथकाने घटनास्थळी भेट देऊन फिर्यादी, साक्षीदार व आजूबाजूच्या लोकांकडे तपास केला. तसेच घटनास्थळ परिसरात तांत्रिक तपास करून गोपनीय माहितीच्या आधारे चोरट्यांनी गुन्ह्यात वापरलेल्या गाडीचा क्रमांक पोलिसांना प्राप्त झाला. या वाहनाची पडताळणी केली असता हे वाहन पोलीस रेकार्डवरील रमेश कुंभार याचे असल्याचे निष्पन्न झाले. पोलिस आरोपी राहत असलेल्या ठाणे येथे जाऊन त्याच्या घराच्या आजूबाजूच्या परिसरात वेषांतर करून चार दिवस पाळत ठेवून होते. तसेच पोलिस निरीक्षक अरुण देवकर यांना रमेश कुंभार हा सातारा बसस्टँड परिसरात असल्याची माहिती प्राप्त झाल्याने त्यांनी तपास पथकांना रमेश कुंभार याला ताब्यात घेऊन कारवाई करण्याच्या सूचना दिल्या. त्याप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने रमेश कुंभार व त्याच्यासोबत असणाऱ्या निलेश गाढवे या दोघांना ताब्यात घेऊन त्यांच्याकडे कसून तपास केला असता त्यांनी चोरी केल्याचे कबूल केले. तसेच त्यांनी फलटण भागातही चोरी तपासात मान्य केले आहे.

# मावळचा गड कोण राखणार?

### मावळात शिंदे गट -ठाकरे गट आमाने सामने





**सतिश गाडे**

**वडगाव मावळ :** राज्यात गेल्या वर्षभरात मोठे राजकीय बदल झाले त्यामुळे लोकसभेच्या निवडणूकाच चित्र जरा बदललेल आहे यातून मावळही सुटलेलं नाही... मावळ, पिंपरी चिंचवड तसेच घाटाखालील रायगड कर्जत उरण या विधानसभा मतदारसंघाचा सामावेश आहे हा मतदारसंघ शिवसेनेचे वर्चस्व असून कायम राहीले आहे. मात्र, यंदाच्या निवडणुकीत चित्र वेगळं आहे, त्याला कारण आहे. सत्तासंघर्ष शिवसेना पक्षाच्या फुटीनंतर विद्यमान खासदार बारणे यांनी एकनाथ शिंदेना साथ दिली आहे त्यामुळे शिवसेना ठाकरे गटाचे संजोग वाघेरे व शिंदे गटाचे श्रीरंग बारणे हे दोन उमेदवार आमनेसामने असणार आहेत. त्यानिमित्ताने मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांच्या थेट सामना पाहायला मिळणार आहे. त्यात कोणाचं पारडं जड होईल हे पाहण औत्सुक्याचं ठरेल.

- **शिवसेना विरुद्ध शिवसेना दुहेरी लढत**

एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेत बंड करून सत्ता स्थापन केली आणि मावळ मतदारसंघाची चक्रेच फिरली. शिवसेनेच्या या मतदारसंघात यंदा मतविभाजनाची मोठी अडचण उमेदवारांसाठी उभी टाकणार आहे. कारण ठाकरे गटाने इथे संजोग वाघेरे यांना उमेदवारी जाहिर केली. तर दुसरीकडे शिंदे गटाकडून श्रीरंग बारणे यांच्या नावाची घोषणा करण्यात आली आहे. बारणे हे मावळचे विद्यमान खासदार आहेत. त्यामुळे यंदा मावळमध्ये शिवसेना विरुद्ध शिवसेना अशी दुहेरी लढत पाहायला मिळणार आहे.

- **महाविकास आघाडीकडून संजोग वाघेरे यांना उमेदवारी**

महाविकास आघाडीच्या जागावाटपात ही जागा ठाकरे गटाला सुटली. त्यानंतर ठाकरे गटाच्या वतीने माजी महापौर संजोग वाघेरे यांना उमेदवारी जाहिर करण्यात आली आहे. संजोग वाघेरे हे राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष आणि माजी महापौर म्हणून त्यांनी काम केले. काही महिन्यांपूर्वीच ते शिवसेना ठाकरे गटात सामील झाले होते. तेव्हापासूनच त्यांची उमेदवारी निश्चित मानली जात होती.

- **वाघेरे यांचा राजकीय प्रवास**

दिवंगत (पान ३ वर)

# देशाच्या परिपूर्ण विकासासाठी मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करा

### आ. जयकुमार गोरेंचा पावसात कार्यकर्त्यांना कानमंत्र!



**राजदंड / वडूज**

माढा लोकसभा भाजपा महायुतीचे उमेदवार खासदार रणजितसिंह नाईक-निंबाळकर यांच्या ऐतिहासिक विजयासाठी माढा मतदारसंघातील सिंचन प्रकल्प व ईतर योजना पूर्ण करण्यासाठी तसेच विकासाचे आणि समृद्धीचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदीना पुन्हा तिसऱ्यांदा पंतप्रधान बनवण्यासाठी तुम्ही सर्वांनी दिवसाची रात्र करून कामाला लागायचं आहे. कोणत्याही परिस्थितीत काहीही करून ही शीट आपल्याला मोठया मताधिक्याने बसवायची आहे. आपल्याकडे (पान ३ वर)

# वडगावातील अवैध ताडी अड्डा 'मनसे स्टाईल'ने उद्‌ध्वस्त

**राजदंड / वडगाव मावळ**

मावळ तालुक्याचे मुख्यालय असलेल्या वडगाव नगरपंचायत हद्दीत मनसेच्या रणाणगिनी नगरसेविका माजी उपनगराध्यक्ष सायली म्हाळसकर यांनी अवैध ताडी विक्री अड्डा उध्वस्त केला. या ताडी विक्री अड्ड्यांमुळे सर्वसामान्य नागरिक, महिलांना त्रास व्हायचा. महिलांच्या छेडछाडी च्या घटना घडत होत्या अखेर शनिवारी दि २० रोजी मनसेच्या महिला पदाधिकाऱ्यांनी येऊन अवैध ताडी विक्रीवर जेसीबी फिरवत अड्डा उध्वस्त केला.

- **मद्यधुंद अवस्थेत असणाऱ्या व्यक्तींचा परिसरातील नागरिकांना नाहक त्रास होत होता.**

वडगाव नगरपंचायत हद्दीतील गावठाण व शहराच्या मध्यवर्ती ठिकाणी असलेले तीर्थक्षेत्र ग्रामदैवत श्री पोटोबा महाराज मंदिर परिसर, जैन मंदिर,जाम मज्जिद या धार्मिक स्थळांच्या आवारात तसेच वडगाव



न्यायालयांच्या न्यायाधीश निवास भिंती लगत अनाधिकृतपणे पत्र शेड उभारून आरोग्यास हानिकारक असलेली ताडी विक्री अड्डा सुरू होता.या ठिकाणी मद्यधुद अवस्थेत असणाऱ्या व्यक्तींचा परिसरातील नागरिकांना नाहक त्रास होत होता.

- **महिला नागरिकांचा सुरक्षेतेचा प्रश्न गंभीर झाला होता**

त्या ठिकाणी आरडाओरडा, मारहाण छेडछाड, अश्लिल शिवीगाळ, लज्जास्पद कृत्य,खुन, खुनाचे प्रयत्न अनेक गैरप्रकार त्या ठिकाणी घडत असल्यामुळे (पान ३ वर)

# अवकाळी पावसाचा फटका



हवामानातील बदलांची चर्चा नेहमी होते आहे. त्यासाठीची कारणे अनेक असली तरी वेळी-अवेळी त्याच्या परिणामांचे फटके वारंवार जाणवू लागले आहे. या वर्षीच्या उन्हाळ्यातील तापमानाची तीव्रता जर पहिली तर याची जाणीव अधिकच तीव्र होत आहे. उन्हाळा सुरू होताच सर्वत्र सरासरी ४० अंश सेल्सिअस तापमानाची पातळी गाठली आहे. उष्माघातापासून सावध राहण्याची सूचना देण्याची आणि केंद्र सरकारला दक्षतेचे उपाय करण्यासाठी नियोजन करण्याची वेळ आली. त्याच्या परिणामीच महाराष्ट्राच्या पश्चिम विदर्भ आणि मराठवाड्याच्या हिंगोली, परभणी, जालना, आदी जिल्ह्यांत अवकाळी पावसाने गेले तीन-चार दिवस धिंगाणा घातला आहे.

नागपूरसह पूर्व विदर्भातही तुरळक पाऊस; मात्र जोरदार वाऱ्याने जनजीवन विस्कळीत करून टाकले आहे. कडकडणाऱ्या विजांसह गारपिटीचा मारा होत होता. त्याचा मोठा फटका आंबा, संत्री, लिंबू, केळी, आदी पिकांना बसला आहे. उशिरा आलेला गहू, ज्वारी, कांदा पिकांसह भाजीपाल्याचेही अतोनात नुकसान झाले आहे. राज्य सरकारने याची नोंद घेत नुकसानीची पाहणी करायला सांगितले आहे. त्यामुळे या घटकेला तरी किती क्षेत्रावरील पिकांचे नुकसान झाले आहे, याचा अंदाज बांधणे कठीण आहे.पश्चिम विदर्भातील अमरावती, अकोला, बुलढाणा तसेच खानदेशातील जळगाव या जिल्ह्यांत सुमारे पन्नास हजार हेक्टरवरील पिकांना फटका बसला आहे. अकोला जिल्ह्यात पिके जमीनदोस्त झाल्याचा वृत्तान्त आला आहे.

अकोला आणि अमरावती जिल्ह्यांत तर सलग तीन दिवस वारा, विजा आणि पावसाचा धिंगाणा चालू होता. याचा सर्वाधिक मोठा फटका लिंबूबागा आणि आंबाबागांना बसला आहे. गतवर्षीच्या हंगामात वेळी-अवेळी झालेल्या पावसाने खरीप तसेच रब्बी पिके साधली नव्हती. उत्पादन घटले आहे. त्या पार्श्वभूमीवर उन्हाळ्याचा तडाखा असताना निर्माण झालेल्या कमी दाबाच्या पट्ट्याने पडत असलेल्या अवकाळी पावसानेशेतकरीवर्गाला संकटात टाकले आहे. अमरावती जिल्ह्यात सर्वांत मोठी गारपीट झाली आहे. त्यात सुमारे १२ हजार हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे.

मराठवाड्यात छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, नांदेड, लातूर तसेच धाराशिव जिल्ह्यात गारपिटीने झोडपून काढले आहे. सर्वाधिक फटका परभणीला बसला आहे. तीन दिवसांच्या या वादळी पावसाने तिघांचा जीव घेतला आहे. अनेक जनावरे दगावली आहेत. घरांची पडझड झाली आहे.

विशेषत: वाड्या-वस्त्यांवर राहणाऱ्या शेतकऱ्यांच्या घरांचे मोठे नुकसान झाल्याचे वृत्त आहे. राज्य सरकारची संपूर्ण यंत्रणा लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीत गुंतलेली आहे. आमदार-खासदार निवडणूक प्रचारात दंग आहेत. त्यांना वाटते की, ही नेहमीची पावसाची मारझोड आहे. आपल्या राजकीय वर्चस्वाचे तळे जपण्यात सारे गुंतले आहेत.जिल्हा परिषदा आणि तालुका पंचायत समित्यांची सभागृहे अस्तित्वात नाहीत. अशा परिस्थितीत शेतकऱ्यांना मदतीचा हात द्यायला कोणालाच सवड नाही, ज्याची-त्याची आपल्या राजकीय भविष्याची चिंता वाढते आहे.

दुर्दैव हे की,शेतकरी, शेतमजूर, आदींसाठी झटणाऱ्या संघटनाही महाराष्ट्राच्या सार्वजनिक जीवनातून हद्दपार झाल्या आहेत. पन्नालाल सुराणा थकले, दत्ता देशमुख, बा. ज. राजहंस, संतराम पाटील, माधवराव गायकवाड, आदी मातीशी नाळ असणारी सोन्याच्या तोलाची माणसं काळाच्या पडद्याआड गेली. अवकाळी किंवा नैसर्गिक आपत्तीसारख्या संकटाच्या काळात सरकारला गदगदा हलविणारे नेते तथा कार्यकर्त्यांची साखळीच संपली आहे. गेल्या दोन्ही पिकांच्या हंगामांत शेतकऱ्यांचे नुकसान झाले तेव्हा सरकारने पंचनामे करण्याचे आदेश दिले. त्याचे पुढे काय झाले याची कोणालाही माहिती नाही. खरीप हंगामात सलग ५० दिवसपाऊसन झाल्याने पिके संकटात आली. गेल्या ऑक्टोबर महिन्यातच ४० तालुक्यांत राज्य सरकारने दुष्काळ जाहीर केला. मात्र एक पैशाची मदत शेतकऱ्यांना दिली नाही.

डिसेंबरमध्ये केंद्र सरकारची नैसर्गिक आपत्ती समिती दुष्काळाची पाहणी करून गेली, त्याला चार महिने झाले. त्यांचे निष्कर्षही समजले नाहीत. केंद्र सरकारने एक पैशाचा निधी दिला नाही. हा मागील बॅकलॉग असताना, निवडणुकांचा धुरळा उडलेला असताना शेतकऱ्यांची अडचण कोणाला दिसणार आहे? बहुतांश सुपर क्लास वन अधिकारी राज्यात किंवा राज्याच्या बाहेर निवडणूक कामात गुंतले आहेत. ४ जूनपर्यंत अर्थात मतमोजणी होईपर्यंत अवकाळी असो की दुष्काळ, याकडे कोणी लक्ष देणार नाही, हे खरे आहे. सतत बदलत असणाऱ्या हवामानाचा हा फटका एकत्रित परिणाम करून जात असला तरी ग्रामीण भागाच्या अर्थकारणावर गंभीर परिणाम जाणवतो आहे

# छाननीत एक अर्ज बाद, लोकसभेच्या रिंगणात ३५ उमेदवार

## सोमवारी अर्ज मागे घेण्याचा अखेरचा दिवस

**धाराशिव :** उस्मानाबाद लोकसभा मतदारसंघासाठी ३६ उमेदवारांनी एकूण ५० उमेदवारी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी एका उमेदवाराचे दोन अर्ज छाननीदरम्यान बाद झाले आहेत. आता उस्मानाबाद लोकसभा निवडणुकीसाठी ३५ उमेदवार रिंगणात शिल्लक राहिले आहेत. सोमवार, २२ एप्रिल रोजी अर्ज मागे घेण्याचा अखेरचा दिवस आहे त्यानंतर खरे चित्र स्पष्ट होईल.

शुक्रवारी उमेदवारी दाखल करण्याचा अखेरच्या दिवशी आर्यनराजे शिंदे (अपक्ष),राजकुमार पाटील (अपक्ष), संजयकुमार वाघमारे (बहुजन समाज पार्टी),विलास घाडगे (अपक्ष), शामराव पवार (समनक जनता पार्टी), नवनाथ उपळेकर (अपक्ष), ड.विश्वजीत शिंदे (आदर्श संग्राम पार्टी), हनुमंत बोंदर (अपक्ष), योगीराज तांबे (अपक्ष),उमाजी गायकवाड (अपक्ष), सौ.अर्चना पाटील (राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी), नेताजी गोरे (अपक्ष), समीरसिंह साळवी (अपक्ष), काकासाहेब खोत (अपक्ष), बाळकृष्ण शिंदे (अपक्ष), भाऊसाहेब आंधळकर (अपक्ष), सोमनाथ कांबळे (अपक्ष),गोवर्धन निंबाळकर (अपक्ष), काका कांबळे (अपक्ष), शेख नौशाद इकबाल (स्वराज्य शक्ती सेना पार्टी),राम शेंडगे (अपक्ष), नितीन मोरे (अपक्ष),अरुण जाधवर (ओबीसी बहुजन पार्टी),सिद्दीक इब्राहीम बोडीवाले (ऑल इंडिया मजलिस ए इलेहादुल मुस्लिमीन), वर्षा कांबळे (अपक्ष),भाऊसाहेब बेलुरे (अपक्ष), नितीन गायकवाड (अपक्ष) या २७ उमेदवारांनी ३३ अर्ज दाखल केले. राजकुमार पाटील, अर्चना पाटील, नेताजी गोरे व ड.विश्वजीत शिंदे या उमेदवारांनी दोन व तीन नामांकन अर्ज दाखल केले आहे.शेवटच्या दिवसअखेर ३६ उमेदवारांनी एकूण ५० नामनिर्देशनपत्र दाखल केले. शेवटच्या दिवशी ६ व्यक्तींनी २० अर्जांची खरेदी केली.

नामनिर्देशनपत्र दाखल करण्याच्या प्रक्रियेस सुरुवात झाल्यापासून शेवटच्या दिवसापर्यंत ७५ व्यक्तींनी १७५ अर्ज खरेदी केले होते. शनिवारी छाननी करण्यात आली छाननी दरम्यान अपक्ष उमेदवार वर्षा कांबळे यांचे दोन उमेदवारी अर्ज बाद ठरविण्यात आले आहेत. वंचितचे उमेदवार भाऊसाहेब आंधळकर यांच्या उमेदवारी अर्जावर महाविकास आघाडीच्या उमेदवार प्रतिनिधी कडून आक्षेप घेण्यात आला होता. मात्र हा आक्षेप फेटाळून लावण्यात आल्यामुळे आंधळकर यांची उमेदवारी कायम राहिली आहे. सोमवार २२ एप्रिल रोजी उमेदवारी मागे घेण्याचा अखेरचा दिवस असल्यामुळे उस्मानाबाद लोकसभा निवडणुकीच्या आखाड्यात त्यानंतर किती उमेदवार शिल्लक राहतात हे पहावे लागेल.

# ‘श्रीराम नवमी’निमित्त ६७० दिंड्या दाखल, शेगावनगरी भाविकांनी फुलली

**बुलढाणा :** संतनगरी शेगाव येथे श्रीराम नवमी उत्सव पारंपरिक उत्साहात साजरा करण्यात आला. यानिमित्त शेगाव नगरी सज्ज झाली होती. मंदिर परिसर सजले. राज्यभरातून ६७० च्यावर भजनी दिंड्या व राज्यातील हजारो भाविक दाखल झाले. यामुळे गजानन महाराज मंदिर परिसर व रस्ते भाविकांनी फुलल. श्रींच्या मंदिरात १३० व्या श्रीराम नवमी उत्सव निमित्त विविध धार्मिक कार्यक्रम आयोजित करण्यात आले.

आध्यात्म रामायण स्वाहाकार यागास १३ एप्रिलला आरंभ झाला होता. सकाळी १० वाजता यागाची पूर्णाहुती व अवभृतस्नान झाले. १० ते १२ यादरम्यान श्रीराम बुवा ठाकूर यांचे श्रीराम जन्मोत्सवाचे कीर्तन पार पडले.

नगर परिक्रमा

आज संध्याकाळी ४ वाजता श्रींच्या पालखीच्या नगरपरिक्रमेला सुरुवात झाले पालखी रथ, मेणा ,अश्व, टाळकरी, पताकाधारी सह परिक्रमेला सुरुवात झाले. सायंकाळी पालखी श्रींच्या मंदिरात नगर परिक्रमा करून पोहोचेल व आरती झाले. रात्री ८ ते १० श्रीहरी बुवा वैष्णव यांचे किर्तन झाले

परिक्रमा मार्ग

गजानन महाराज मंदीर उत्तर द्वार (‘जनरेटर रुम’ जवळील) मधुन बाहेर, महात्मा फुले बँकेसमोरुन, क्रांतीसुर्य ज्योतीराव फुले चौक, सावता महाराज चौक, हरिहर मंदीर, भीम नगर, तिन पुतळा परिसर, न प शाळा फुले नगर, प्रगटस्थळ, सितामाता मंदीर असा मार्ग झाले. लायब्ररी पुलावरुन मंदीराचे पश्चिम द्वार मधुन श्रींचे मंदीर परिसरामध्ये परत. श्रींचे दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांची गर्दी लक्षात घेता मंदिर परिसरात एकेरी मार्ग करण्यात आला. त्यात दर्शनबारी, श्रीमुख दर्शनबारी, महाप्रसाद, श्रींचे पारायण मंडप, श्रींची गादी पलंग, दर्शनाची व्यवस्था करण्यात आली.

**१८ एप्रिलला सांगता झाली**

श्रींच्या मंदिर परिसरात आंबाच्या पानांचे तोरण, केळीच्या खांबा, रंगबेरंगी फुलांची सजावट करण्यात आली होती. श्रींचे आराध्यदेवत असलेल्या प्रभु श्री राम व श्रींच्या मंदिरावर व मंदिर परिसरात विद्युत रोषणाई करण्यात आली होती. १८ एप्रिल रोजी श्रीराम बुवा ठाकूर यांचे सकाळी ६ ते ७ काल्याचे किर्तन व दहिहंडी, गोपालकाला नंतर उत्सवाची सांगता झाले

# शोभाताई बच्छावांनी विरोधकांवर डागली तोफ

**धुळे :** काँग्रेसच्या उमेदवार डॉक्टर शोभाताई बच्छाव यांनी काल धुळे येथे बैठक घेऊन प्रचाराला सुरुवात केली. या वेळी महाविकास आघाडीच्या घटक पक्षांचे नेते उपस्थित होते. या बैठकीला अपवाद वगळता सर्व प्रमुख नेते उपस्थित होते.

डॉ. बच्छाव यांना काँग्रेस पक्षाची उेपसीर्शीी उमेदवारी जाहीर झाली, त्यानंतर भारतीय जनता पक्षाच्या नेत्यांनी त्या मतदारसंघाबाहेरच्या आहेत, असा प्रचार सुरू केला होता. त्याला डॉक्टर बच्छाव यांनी सडेतोड उत्तर दिले.



या वेळी डॉक्टर शोभाताई बच्छाव म्हणाल्या, भारतीय जनता पक्षाचे इगझ कार्यकर्ते आणि नेते खोटा प्रचार करतात. त्यांना ती सवयच आहे. मात्र, जनता अशा प्रचाराला बोलणार नाही. गेल्या दहा वर्षांत भाजपने धुळे मतदारसंघासाठी कोणतेही ठोस काम केलेले नाही. केवळ भूलथापा मारल्या आहेत. धुळे शहराचे उर्ह्रीश्रश अनेक प्रश्न प्रलंबित आहेत. मतदारसंघाच्या विकास आणि जनतेच्या प्रश्नांसाठी मी लोकसभेत जाण्यासाठी मतदारांचा कौल घेत आहे. मतदारांचा पाठिंबा निश्चितच मला मिळेल.

त्या म्हणाल्या, भाजपचे लोक म्हणतात मी बाहेरची आहे. मात्र माझा जन्म धुळे येथे झाला आहे. धुळ्यातच माझे शिक्षण झाले. धुळे हे माझे आजोळ आहे. माझं माहेर मालेगाव आहे. कसमादेमध्ये माझे सासर आहे. मी धुळ्याची पालकमंत्री राहिली आहे. पालकमंत्री पदाच्या कारकिर्दीत धुळे शहराच्या उर्ह्रीश्रश विकासाचे अनेक प्रश्न मी सोडविले. धुळे शहरातील कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांना मी नवीन नाही. त्यांच्याशी माझा नियमित संपर्क आहे. त्यामुळे मला बाहेरची म्हणणाऱ्यांना जनता योग्य उत्तर देईल.

केंद्रातील भारतीय जनता पक्षाचे इगझ त्र्रेंशीपाशर्पी सरकार शेतकरी आणि गरिबांच्या विरोधातील आहे. आज शेतकऱ्यांचे प्रश्न अत्यंत तीव्र स्वरूपात पुढे येत आहेत. कांदा निर्यातबंदीपासून तर शेतमालाला भाव मिळत नाही. असे अनेक प्रश्न आहेत. बेरोजगारीचा प्रश्न तीव्र झाला आहे. महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न आहे. स्थानिक नागरिकांना विकासाच्या प्रक्रियेत सहभागी करून घेण्यासाठी कोणत्याही प्रयत्न होत नाही. त्यामुळे जनता भाजप सरकारला कंटाळली आहे. यंदा जनता हमखास परिवर्तन करेल, असा विश्वास या वेळी त्यांनी व्यक्त केला.

या वेळी काँग्रेसचे प्रदेश कार्याध्यक्ष आमदार कुणाल पाटील, शिवसेना ठाकरे गटाचे जिल्हाध्यक्ष माजी आमदार शरद पाटील, नाशिक जिल्हा काँग्रेसचे अध्यक्ष माजी आमदार शिरीष कोतवाल, माजी खासदार बापू चौरे, प्रतिभा शिंदे, माजी आमदार डी. एस. अहिरे, शिवसेनेचे महेश भाऊ मिस्त्री, हिलाल माळी, माजी महापौर भगवान करणकाळ, रमेश श्रीखंडे, राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाचे जितेंद्र मराठे, समाजवादी पक्षाचे गुड्डू भाऊ, जमील मंसूरी, हेमंत भदाणे, महेश घुगे आदी उपस्थित होते.

# मुंबईकरांची काहिली कमी होणार

**मुंबई :** मागील दोन दिवसांपासून उन्हाचे चटके आणि उष्मा काहीसा कमी झाला आहे. तसेच चाळिशीच्या आसपास असलेले तापमान आता थेट ३४ अंशावर आले आहे. त्यामुळे मुंबईकरांना कडक उन्हापासून दिलासा मिळाला आहे. दरम्यान, मुंबई, तसेच उपनगरांत रविवारपासून हवेतील आर्द्रतेचे प्रमाण कमी होणार असून तापमान ३४ अंश सेल्सिअसदरम्यान राहील, असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला आहे.

गेल्या काही दिवसांपासून मुंबईकरांना उन्हाचे चटके आणि असल्य उकाडा सोसावा लागत होते. मात्र, बुधवारपासून मुंबईकरांना काहीसा दिलासा मिळाला आहे. हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात बुधवारी ३४ अंश सेल्सिअस, तर सांताक्रूझ केंद्रात ३४.७ अंश सेल्सिअस कमाल तापमान नोंदले गेले. त्यामुळे ३९ आणि ४० अंशावर गेलेले तापमान आता थेट ३४ अंशावर आले आहे. त्यामुळे उन्हाची तीव्रता कमी झाली आहे. मुंबईत शनिवारी उष्ण व दमट हवामान राहील असा अंदाज हवामान विभागाने व्यक्त केला होता. त्यानुसार हवामान विभागाच्या कुलाबा केंद्रात शनिवारी ३३.५ तर, सांताक्रूझ केंद्रात ३५.४ अंश सेल्सिअस कमाल तापमानाची नोंद झाली. सांताक्रूझ केंद्रावरील तापमान शुक्रवारच्या तुलनेत १ अंशांनी वाढल्याचे निदर्शनास आले. दरम्यान, मुंबई शहर तसेच उपनगरांत रविवारपासून आर्द्रतेत घट होऊन उष्मा काही प्रमाणात कमी होण्याची शक्यता हवामान विभागाो वर्तविली आहे.

गेल्या काही दिवसांतील कमाल तापमान

सोमवार,१५ एप्रिल

कुलाबा- ३४.७, सांताक्रूझ - ३७.९

मंगळवार, १६ एप्रिल

कुलाबा - ३५.२ , सांताक्रूझ - ३९.७

बुधवार, १७ एप्रिल

कुलाबा - ३४, सांताक्रूझ - ३४.७

गुरुवार, १८ एप्रिल

कुलाबा- ३३.२ , सांताक्रूझ - ३४.४

शुक्रवार, १९ एप्रिल

कुलाबा- ३३.७, सांताक्रूझ - ३४.८

# काँग्रेस नाशिक प्रभारी जिल्हाध्यक्षपदी शिरीष कोतवाल

नाशिक : धुळे लोकसभा मतदारसंघात काँग्रेसने माजी राज्यमंत्री डॉ. शोभा बच्छाव यांना उमेदवारी दिल्याच्या निषेधार्थ डॉ. तुषार शेवाळे यांनी नाशिक जिल्हाध्यक्षपदाचा राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या पदावर पक्षाने प्रभारी जिल्हाध्यक्ष म्हणून चांदवडचे माजी आमदार शिरीष कोतवाल यांची नियुक्ती केली आहे. माजी जिल्हाध्यक्ष आणि पदाधिकाऱ्यांची नाराजी दूर केली जाईल, असे त्यांनी म्हटले आहे.

काँग्रेसचे प्रांताध्यक्ष नाना पटोले यांच्या मान्यतेने ही नियुक्ती करण्यात आली. धुळे लोकसभा मतदारसंघात भाजपने विद्यमान खासदार डॉ. सुभाष भामरे यांची उमेदवारी जाहीर करुन पाच आठवड्याचा कालावधी उलटल्यानंतर काँग्रेसने नाशिकच्या माजी राज्यमंत्री डॉ. शोभा बच्छाव यांना रिंगणात उतरविण्याचा निर्णय घेतला. डॉ. बच्छाव यांना पक्षातून विरोध झाला. त्यातूनच काँग्रेसचे नाशिक जिल्हाध्यक्ष डॉ. शेवाळे यांनी पदाचा राजीनामा दिला. धुळ्यातही तशीच स्थिती उद्भवली. डॉ. शेवाळे यांनी अडगळीत पडलेला बाहेरील चेहरा धुळ्यात उमेदवार म्हणून लादल्याचा आरोप पक्षश्रेष्ठींवर केला होता. जिल्हाध्यक्षांच्या आक्रमक भूमिकेमुळे निवडणूक काळात अडचणी वाढण्याची शक्यता लक्षात घेत पक्षाने तातडीने प्रभारी अध्यक्ष म्हणून माजी आमदार कोतवाल यांची नियुक्ती केली.तिकीट एक आणि मागणारे दोन, अशी स्थिती असल्याने काहीअंशी नाराजी स्वाभाविक होती. परंतु, एकदा उमेदवारी जाहीर झाल्यावर सर्वांनी समन्वयाने काम करायला हवे. नाशिक आणि धुळे जिल्ह्यातील माजी अध्यक्षांची आपण स्वत: भेट घेऊन समजूत काढू. दोघेही काँग्रेसचे कट्टर कार्यकर्ते आहेत. आजवर अन्य पक्षांनी त्यांना आमिष दाखवूनही ते कुठेही गेले नाहीत. नेतेमंडळीही त्यांची समजूत काढून नाराजी दूर करतील, असा विश्वास नवनिर्वाचित प्रभारी जिल्हाध्यक्ष कोतवाल यांनी व्यक्त केला.

# उष्णतेच्या लाटेत सुरळीत वीजपुरवठ्यासाठी महावितरण, महापारेषणची उच्चस्तरीय बैठक

## वीजपुरवठ्यातील व्यत्यय टाळण्यासाठी तांत्रिक कामे सुरू

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** यंदाच्या उन्हाळ्यातील उष्णतेची प्रचंड लाट सध्या सुरू असल्याने विजेच्या मागणीमध्ये मोठी वाढ झाली आहे. सोबतच वादळी पाऊस व गारपिटीचा तडाखा बसत आहे. या परिस्थितीत वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महावितरण व महापारेषणच्या पुणे परिमंडलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांची समन्वय बैठक झाली. तीत प्रामुख्याने लोणीकंद ४०० केव्ही, एनसीएल २२० केव्ही अतिउच्चदाब उपकेंद्रावरील वीजभार विभाजित करून तो अन्यत्र वळवणे तसेच पारेषणच्या काही उपकेंद्रातून २२ केव्हीच्या नवीन वितरण वीजवाहिन्यांसाठी उपाययोजना आदी तांत्रिक कामांचे निर्णय घेण्यात आले व त्यासंदर्भात युद्धपातळीवर कामेही सुरू करण्यात आली.




रास्तापेठ येथील ‘प्रकाशदूत’ सभागृहात झालेल्या या बैठकीमध्ये मुख्य अभियंता राजेंद्र पवार (महावितरण) व अनिल कोलप (महापारेषण) यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी पुणे परिमंडलातील सर्वच १२ विभागनिहाय पारेषण व वितरण यंत्रणेचा आढावा घेण्यात आला व त्यानुसार तांत्रिक उपाययोजनांचे निर्णय घेत भारव्यवस्थापनेतून वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी विभागपातळीवर २४७ समन्वय ठेवण्याचे निर्देश कार्यकारी अभियंत्यांना देण्यात आले.

पुणे परिमंडलामध्ये सुमारे ३१०० मेगावॅट विजेची मागणी आहे. परंतु गेल्या दोन-तीन दिवसांपासून उष्णतेची प्रचंड लाट आली आहे. पर्यायाने विजेच्या मागणीत मोठी वाढ झाली आहे. त्यामुळे महापारेषणच्या काही अतिउच्चदाबाचे उपकेंद्र व वीजवाहिन्यांवर ताण येत आहे. पारेषण यंत्रणेतील संभाव्य धोके व बिघाड टाळण्यासाठी स्वयंचलित भारव्यवस्थापन यंत्रणा म्हणजेच ‘एलटीएस’ (डेरव ढीळाळपस डलहशाश) यंत्रणा कार्यान्वित होत असल्यामुळे नाईलाजाने काही ठिकाणी वीजपुरवठा बंद ठेवावा लागत आहे. यासोबतच अवकाळी वादळी पाऊस व गारपिट यामुळेही पारेषण व वितरण यंत्रणेवर परिणाम होत आहे.

या पार्श्वभूमिवर पुणे परिमंडलातील वीजपुरवठा सुरळीत ठेवण्यासाठी महापारेषणच्या लोणीकंद ४०० केव्ही उपकेंद्रातील काठापूर व आळेफाटा २२ केव्ही वीजवाहिन्यांचा भार हा बाभळेश्वर ४०० केव्ही उपकेंद्रावर देण्याचा निर्णय झाला. शुक्रवारी (दि. १९) रात्री उशिरा हे काम पूर्ण होईल. या उपायामुळे लोणीकंदवरील वीजभार कमी झाल्यामुळे मंचर विभागातील प्रामुख्याने शेतीपंपांसह इतर सर्व ग्राहकांना सुरळीत वीज उपलब्ध होईल. तसेच चाकण व तळेगाव अतिउच्चदाब वीजवाहिन्यांना फायदा होणार आहे. तसेच गणेशखिंड येथील एनसीएल १३२ केव्ही उपकेंद्रातील काही वीजभार फ्लॅगशिप २२० केव्ही उपकेंद्राकडे वळविण्यात येत आहे. यासोबतच राजगुरुनगर विभागातील तळेगाव, कामशेत, पवना येथील वीजवाहिन्यांना खोपोलीवरून वीजपुरवठा करण्यात येणार आहे.

या बैठकीमध्ये महापारेषणच्या विविध उपकेंद्रांमध्ये महावितरणच्या नवीन २२ केव्ही वीजवाहिन्या कार्यान्वित करण्यासाठी तांत्रिक उपाययोजना करणे आणि पर्यायाने अस्तित्वात असलेल्या वीजवाहिन्यांवरील भार कमी करणे याबाबतचे नियोजन प्रस्तावित करण्यात आले. त्यासाठी युद्धपातळीवर कामे सुरू करण्याचे निर्देश मुख्य अभियंता राजेंद्र पवार व अनिल कोलप यांनी दिले. यावेळी महापारेषण व महावितरणचे अधीक्षक अभियंता श्री. अरविंद बुलबुले, युवराज जरग, विठ्ठल भूजबळ, जयंत कुलकर्णी, अमित कुलकर्णी तसेच कार्यकारी अभियंत्यांची उपस्थिती होती.

मालक, मुद्रक, प्रकाशक नरेश व्ही. देसाई यांनी सरस्वती प्रिंटिंग प्रेस, १६ मंगळवार पेठ, सातारा येथे मुद्रित करून, रामकमल बिल्डिंग, ७, रामकृष्ण कॉलनी, सिव्हिल हॉस्पिटल रोड, सातारा येथून प्रकाशित केले. संपादक : नरेश व्ही. देसाई. फोन : ९९६०३५०९९९, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : ७२१०५/९९

Owner, Printer, Publisher Naresh V. Desai. Printed at Saraswati Printing Press, 16 Mangalwar Peth, Satara. Published from Ramkamal Building, 7, Ramkrishna Colony, Civil Hospital Road, Satara. Editor : Naresh V. Desai. Phone : 9960350999, Email : rajdand.wmgmail.com, RNI NO. : 72105/99

# मावळचा गड कोण राखणार?

(पान १ वरून)

महापौर भिकू वाघेरे यांचे संजोग वाघेरे हे चिरंजीव आहेत. त्यांच्या पत्नी उषा वाघेरे या स्थायी समितीच्या सभापती होत्या. संजोग वाघेरे हे राष्ट्रवादी काँग्रेसचे जेष्ठ नेते होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्ष आणि माजी महापौर म्हणून त्यांनी काम केले. मावळची जागा ही शिवसेनेची आहे. ३० डिसेंबर २०२३ ला राष्ट्रवादीला रामराम ठोकून त्यांनी शिवसेना उद्धव ठाकरे गटात प्रवेश केले होता. नगरसेवकपदापासून सुरू झालेला प्रवासात त्यांनी महापौर, पीसीएमटीचे सभापती, राष्ट्रवादी काँग्रेसचे शहराध्यक्षपदापर्यंत भूषविला.

■ **सन २०२९ मध्ये लोकसभेच्या उमेदवारीसाठी वाघेरे इच्छुक होते**

दरम्यान, २०१४ आणि २०१९ मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसमध्ये असताना संजोग वाघेरे यांना लोकसभेची निवडणूक लढविण्यास ते ईच्छुक होते मात्र, २०१९ मध्ये अजित पवार यांचे पुत्र पार्थ पवार हे मावळ मतदारसंघाचे राष्ट्रवादीचे उमेदवार असल्याने त्यांना ही इच्छा मनातच ठेवावी लागली. त्यावेळी वाघेरे यांनी माघार घेतली होती. मात्र, यावेळी निवडणूक लढण्याचे निश्चित करत त्यांनी ठाकरे गटात प्रवेश केला

■ **श्रीरंग बारणे यांना तिसऱ्यांदा संधी**

मावळ लोकसभा मतदारसंघ महायुतीत शिंदे गटाला सुटला. त्यानंतर शिंदे गटाने विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांना उमेदवारी जाहीर केली आहे. खासदार बारणे तिसऱ्यावेळी निवडणुकीला सामोरे जात आहेत. दरम्यान, महायुतीमधील मित्रपक्ष भाजप, राष्ट्रवादी काँग्रेसच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांनी खासदार बारणे यांच्या उमेदवारीला विरोध केला होता. मावळमध्ये भाजपने कमळावर उमेदवार असावा अशी मागणी केली होती. तर अजित पवार गटानेही मावळवर दावा केला होता. खासदार बारणे हे देखील कमळावर निवडणूक लढवतील अशी अनेक दिवस चर्चा होती. मात्र अखेर शिंदे गटाकडूनच त्यांना खासदारकीची हॅट्रिक करण्याची संधी मिळाली आहे.

■ **बारणे यांचा राजकीय प्रवास**

सन १९९७ साली श्रीरंग बारणे यांनी नगरसेवकपदा पासून आपल्या राजकीय कारकीर्दी सुरू केली १९९७ ते २०१२ या काळात श्रीरंग बारणे यांनी पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेत स्थायी समिती अध्यक्ष, विरोधी पक्षनेता अशी अनेक पदे भुषविली.

२०१४ मध्ये शिवसेनेचे पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी श्रीरंग बारणे यांना उमेदवारी दिली. या निवडणुकीत बारणे यांनी राष्ट्रवादीचे राहुल नार्वेकर आणि शेकापचे उमेदवार दिवंगत लक्ष्मण जगताप यांना पराभूत करत विजय मिळवला.

त्यानंतर २०१९ च्या निवडणुकीत शिवसेना विरुद्ध राष्ट्रवादी अशी थेट लढत झाली तेव्हा बारणेणीच विद्यमान उपमुख्यमंत्री अजित पवारांचे पुत्र पार्थ पवार यांना मोठ्या मताधिक्याने पराभूत केले होत.

मात्र, आता मावळच चित्र वेगळं आहे मावळ लोकसभेची जागा शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाचे संजोग वाघेरे पाटील सारखा तगडा उमेदवार दिल्याने सध्या तरी बाजू त्यांची भक्कम दिसत आहे. महायुतीकडून विद्यमान खासदार श्रीरंग बारणे यांना पुन्हा मैदानात उतरवण्यात आले आहे मात्र राज्यातील राजकीय समीकरणे बदलल्यामुळे मावळ लोकसभा मतदारसंघात विद्यमान खासदार श्रीरंग बारणे महायुतीला तारणार की?महाविकास आघाडी भक्कम रहाणार चा प्रश्न मतदारसंघात उपस्थित होत आहे? मावळचा गड कोण राखणार, याबाबतची उत्सुकता आता शिगेला पोहचली आहे.बारणेची 'हॅट्रीक' रोखणार का, याबाबत दावे-प्रतिदावे केले जात आहेत.

# १० वर्षात केंद्र व राज्य सरकारमध्ये सत्ता असूनही भाजपने मोठा विकासनिधी पुण्यासाठी आणला नाही

## रवींद्र धंगेकर यांचा हल्लाबोल

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** केंद्रात व राज्यात सत्ता आणि पुण्यात ६ आमदार व सुमारे १०० नगरसेवक असूनही गेल्या १० वर्षात पुण्याच्या विकासाला खीळ का बसली?आणि पुण्याच्या विकासाबद्दल भाजपला आकस आहे काय? असे प्रश्न पुणेकरांना पडले आहेत. त्यामुळेच पुण्यात भाजप बद्दल नकारात्मक भावना मोठ्या प्रमाणात दिसून येत आहे. गेल्या १० वर्षात केंद्र व राज्य सरकारमध्ये सत्ता असूनही भाजपने मोठा विकासनिधी पुण्यासाठी आणला नाही. त्यामुळे वाहतूक कोंडी, सुरळीत पाणी पुरवठा, पर्यावरण असे अनेक प्रश्न आता बिकट बनले आहेत. आपल्या पुण्याला खऱ्या अर्थाने 'सुखी शहर' करण्यासाठी परिवर्तन करा आणि पंजाच्या चीन्हापुधील बटन दाबून काँग्रेसला विजयी करा, असे आवाहन महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे काँग्रेस पक्षाचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी आज केले.



पर्वती विधानसभा मतदार संघातील पदयात्रा संपल्यानंतर ते बोलत होते. यापूर्वी'काय म्हणतात पुणेकर? निवडून येणार धंगेकर' च्या जोरदार घोषणा देत महाविकास आघाडी व इंडिया आघाडीच्या कार्यकर्त्यांनी पर्वती विधानसभा मतदार संघात अतिशय उत्साही प्रचार केला.

पुणे लोकसभा मतदार संघातील महाविकास आघाडी व इंडिया आघाडीचे काँग्रेसचे उमेदवार रवींद्र धंगेकर यांनी आपला निवडणुकीचा उमेदवारी अर्ज भरल्यानंतर पहिल्याच दिवशी प्रचाराचा धडाका सुरू केला. सकाळच्या सत्रात उत्साही कार्यकर्ते कसबा विधानसभा मतदार संघात पदयात्रा केल्यानंतर, संध्याकाळी त्यांनी पर्वती विधानसभा मतदार संघात प्रचार यात्रा घेतली. महाविकास आघाडी आणि इंडिया आघाडीतील घटक पक्षांचे स्थानिक नेते व कार्यकर्त्यांनी या पदयात्रेत सहभागी होत, धंगेकर यांचा अतिशय उत्साहाने प्रचार केला. काँग्रेस पक्ष, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्ष, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष, आम आदमी पार्टी आणि अन्य मित्र पक्षांचे प्रमुख पदाधिकारी व कार्यकर्ते अशा विविध पक्षांचे अनेक कार्यकर्ते आवर्जून सहभागी झाले होते. यामध्ये अभय छाजेड, नितीन कदम, अश्विनी कदम, सतीश पवार, शशीकांत तापकीर, सचिन तावरे, रमेश सोनकांबळे, संतोष पाटोळे , नरेंद्र व्यवहारे, बंडू नलावडे, हरीश यादव, अशोक हरणावळ, बाळासाहेब ओसवाल, बाळासाहेब भांबरे, जयकुमार ठोंबरे, अर्जुन जानगवळी, डी एच पोळेकर, संजय उपरंडे, स्वप्नील नाईक, संतोष गेले, गणेश लगट, विजय शिंदे, आशुतोष शिंदे, सचिन देढे, सुरेश चौधरी, मृणालिनी वाणी, ऋषिकेश भुजबळ, तुषार नांदे, प्रतीक खोपडे, अनिल सातपुते , सतीश पवार, संतोष गेडे, सुधीर ढमाले, ताई कसबे, अमोल परदेशी, अर्चना शहा, आकाश मोहिते, सोमनाथ खंडाळे, अजय मिसळ महादेव जाधव, धर्मेंद्र धावरे, जयराम भोसले, श्रीरंग खंडाळे, अक्षय सागर, रोहित पवार, अमोल खंडाळे, मुकुंद काकडे, प्रवीण खत्री, शैलेश मोहिते, बाळासाहेब मोहिते, पराग थोरात आदी कार्यकर्त्यांचा समावेश होता.

## परळी खोऱ्यात पाऊस

**परळी :** परळी (ता. सातारा) व उरमोडी धरण परिसरात आज सायंकाळी ४ वाजण्याच्या सुमारास मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला.

# जिंकण्यासाठी षड्यंत्र रचणे हेच काँग्रेसचे चरित्र

## भाजपच्या विजयासाठी मतदारच उत्सुक : धीरज घाटे

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** भारतीय जनता पक्ष हा दोन खासदारांपासून, ३०० पेक्षा जास्त खासदार निवडून आणणारा पक्ष आहे. हे साध्य करण्यासाठी भाजपने कधीही कोणतेही षडयंत्र केले नाही केवळ कार्यकर्त्यांच्या मेहनतीवर आणि मतदारांचा विश्वास मिळवत हे साध्य करून दाखवले आहे, हा इतिहास फार जुना नाही. देशातील मतदारच भाजपला तिसऱ्यांदा विजयी करत नरेंद्र मोदी यांना पंतप्रधानपदी पाहण्यासाठी उत्सुक आहे. सर्वच गोष्टी जर भाजपच्या बाजूने असतील, तर विजयासाठी पुण्यात भाजपला षडयंत्र करण्याची गरज नाही हे सामान्य मतदाराही समजते. उलट काहीही करा पण निवडणूक जिंकून सत्ता काबीज करा, हे अलिखित आणि अघोषिक धोरण गेली ६०-७० वर्षे देशात राबवणाऱ्या काँग्रेसचे चरित्र षडयंत्र रचण्याचेच आहे, असा घणाघात भारतीय जनता पार्टीचे पुण्याचे अध्यक्ष धीरज घाटे यांनी केला आहे.

एमआयएम पक्षाची पुण्यात अनिस सुंडके यांना उमेदवारी मिळणे हे पराभवाच्या भीतीपोटी भाजपाचे पडद्यामागील षडयंत्र असल्याचा आरोप काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस ऍड. अभय छाजेड यांनी पत्रकाव्दारे केला आहे. त्या आरोपांचा समाचार शहराध्यक्ष घाटे यांनी सुस्पष्ट शब्दात घेतला. ते म्हणाले, 'गेली दहा वर्षे काँग्रेस सत्तेच्या बाहेर असल्याने त्यांना येनकेनप्रकारे त्यांना सत्ता हवी असल्याने त्यासाठी ते षडयंत्र रचण्याची शक्यता नाकारती येत नाही. पुण्यातील मतदारांनी सन २०१४ आणि २०१९ साली मोदीजींसाठी कसे मतदान केले याचा इतिहास ताजा आहे. यावेळीही मतदारांनी त्यांचे मन बनवले असून आता पुण्यातील नाही तर देशातील मतदार मोदीजींना पुन्हा तिस-यांचा पंतप्रधान करण्यासाठी उत्सुक असल्याचे दिसत आहे.

घाटे यांनी सांगितले की, 'अन्य पक्षातून काँग्रेसमध्ये केवळ तिकिटासाठी आलेल्या रविंद्र धंगेकरांना काँग्रेसने काही महिन्यापूर्वी विधानसभेच्या पोटनिवडणुकीत उमेदवारी दिली. आता पुन्हा त्यांनाच लोकसभेसाठी उमेदवारी दिली असल्याने धंगेकरांना उमेदवारीवरुन कार्यकर्त्यांच्यातील मोठा वर्ग नाराज आहे. ही नाराजी व्यक्त करण्याचा एक भाग म्हणून भाजपसारख्या पक्षावर षडयंत्राचे आरोप केले जात आहेत.

राहता राहिला एमआयएम ही भाजपची बी टीम असल्याचा दावा, तो दावा किती पोकळ आहे, हे वारंवार सिद्ध झाले आहे. निवडणूक आयोगाने हैद्राबादमधील ५ लाख ४० हजार बोगस मतदारांची नावे काढून टाकली आहेत. तसेच हैद्राबादमध्ये मोठ्या संख्येने बोगसमतदार असल्याचा आरोपच तेथील भाजपच्या उमेदवार माधवी लता यांनी जाहीरपणे केला होता. जर एमआयएम ही भाजपची बी टीम असती तर भाजपचे त्यांचे नुकसान ऐन निवडणुकीत केले असते का'

ज्या काँग्रेसने सर्वोच्च न्यायालयात शपथेवर श्रीराम काल्पनिक असल्याचे सांगितले होते, त्याच काँग्रेसच्या सर्व नेत्यांवर रामनवमीच्या शुभेच्या देऊन पत्रकार परिषद सुरू करण्याची वेळ का आली ? आमची सत्ता राज्यात १९९५ साली आली पण नंतर पंधरा वर्षे नाही आली. जेव्हा काँग्रेसच्या कारभाराला लोक कंटाळले आणि त्यांनी २०१४ साली भाजपला सत्तेवर बसवले. जे राज्यात तेच केंद्रात, स्व. अटलजींचे सरकार २००४ साली गेल्यानंतर काँग्रेसची सत्ता देशात आली, पण अवघ्या दहाच वर्षात देशातील जनतेने बहुमताने भाजपला केंद्रात सत्ता दिली. त्यासाठी कोणतेही षडयंत्र करावे लागले नाही, कारण ते भाजपचे चरित्रच नाही, असेही घाटे यांनी स्पष्ट केले.

पान १ वरून

## वडगावातील अवैध ताडी अड्डा 'मनसे स्टाईल'ने उद्ध्वस्त

त्या ठिकाणचे वातावरण पूर्णपणे दूषित झाले होते. आठवडे बाजार साठी येणाऱ्या महिला नागरिकांचा सुरक्षेतेचा प्रश्न गंभीर झाला होता. या सर्व प्रकारामुळे सांस्कृतिक कार्यक्रमाची राजधानी म्हणून ओळख असणाऱ्या वडगाव शहराची गुन्हेगारी, जुगार दारू अड्डा म्हणून होऊ लागली होती.

■ **धार्मिक स्थळाच्या पवित्रास बाधा**

धार्मिक स्थळाच्या पवित्रास बाधा तसेच लहान मुलं व महिलांच्या सुरक्षितेचा प्रश्न निर्माण करणाऱ्या अवैध ताडी विक्री अड्डायाचचा परवाना कायमस्वरूपी रद्द करून व्यसनाधीन व गुन्हेगारी प्रवृत्ती पासून मुक्त होण्यास सहकार्य करावे असे निवेदन राज्य उत्पादन शुल्क विभागाला मनसेच्या नगरसेविका सायली म्हाळसकर यांनी दिले होते. तसेच या निवेदनाची गांभीर्यादाखल घ्या अन्यथा मनसे स्टाईलने सदरील अवैध ताडी विक्री अड्डा व उध्वस्त करू असा इशारा दिला होता.

■ **वारंवार मागणी करूनही प्रशासनाचे दुर्लक्ष**

वारंवार मागणी करून सुद्धा प्रशासनाने दुर्लक्ष केले असल्याने अखेर आज दि २० रोजी वडगाव नगरपंचायतीच्या मनसेच्या नगरसेविका सायली रुपेश म्हाळसकर यांनी अवैध ताडी विक्री अड्डा जेसीबी फिरवत उध्वस्त केला आहे. त्यावेळी मनसेचे पदाधिकारी महिला पदाधिकारी मोठ्या प्रमाणावर उपस्थित होत्या.

## देशाच्या परिपूर्ण विकासासाठी मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान करा

अनेक नवीन कार्यकर्ते येणार आहेत,जुन्यांनी अविर्भाव न दाखवता नव्यांना सन्मानाची वागणूक द्यायची आहे. अशा शब्दात माण खटाव चे आमदार जयकुमार गोरेंनी आपल्या कार्यकर्त्यांना कानमंत्र दिला.

आमदार जयकुमार गोरे यांनी बोराटवाडी, ता. माण येथील त्यांच्या निवासस्थानी आयोजित केलेल्या मतदारसंघातील पदाधिकारी व कार्यकर्त्यांच्या मेळाव्यात आमदार गोरे बोलत होते.

नरेंद्र मोदींना तिसऱ्यांदा पंतप्रधान बनविण्यासाठी खासदार रणजितसिंह नाईक- निंबाळकर यांना ऐतिहासिक मतांनी विजयी करण्याचा निर्धार यावेळी सर्वांनी केला.

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वात देश प्रगतीच्या दिशेने वेगाने वाटचाल करत आहे, मात्र स्वतःच्या स्वार्थासाठी विरोधी पक्ष आघाडी करून देशाचा हा विकासरथ रोखण्याचा प्रयत्न करत आहेत. त्यांचा हा प्रयत्न आपण यशस्वी होऊ द्यायचा नाही असे आवाहनही आमदार जयकुमार गोरे यांनी यावेळी केलं. तर शरद पवारांनी आजपर्यंत अनेक घराण्यात उभी फूट पाडली. त्यावेळी त्या घरातील लोकांना काय यातना झाल्या असतील, तीच वेळ नियतीने त्यांच्यावर आणली असल्याची जहरी टीका आमदार गोरेंनी यावेळी केली.

मेळाव्यास पक्षाचे मतदार संघातील पदाधिकारी, कार्यकर्ते आणि लोकसभा मतदारसंघातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## मावळ तालुक्यात पाण्यासाठी मुक्या जनावरांची भटकंती थांबणार

**वडगाव मावळ :** शिरोता वनपरिक्षेत्रात वन विभागाकडून प्राण्यांसाठी नैसर्गिक टाक्यांमध्ये पाणी सोडण्याची मोहीम हाती घेण्यात आली आहे. नैसर्गिक टाक्यांमध्ये पाणी आल्याने नैसर्गिक अधिवासात राहणाऱ्या मुक्या प्राण्यांची पाण्यासाठीची भटकंती थांबणार आहे. या उपक्रमाचे विविध स्तरातून कौतुक होत आहे.

मावळ तालुक्यात मोठ्या प्रमाणात नैसर्गिक साधनसंपत्ती आहे. जंगलाचे क्षेत्र मोठे असल्याने या भागात सर्व प्रकारचे प्राणी आढळून येतात. सध्या उन्हाळा वाढत आहे. बहुतांश नैसर्गिक पाणवठ्यांमधील पाणी आटले आहे. सर्व पाणवठे कोरडे पडल्याने जंगली प्राण्यांना पिण्यासाठी पाणी मिळेनासे झाले आहे.

प्राण्यांना मुबलक पाणी आणि अन्न मिळाले नाही तर ते त्याच्या शोधात मानवी वस्तीत येतात. तिथे आल्यानंतर त्यांच्या जीवाला धोका निर्माण होतो. तसेच वन्य प्राणी आणि मानव असा संघर्ष देखील होतो. हे सर्व प्रकार टाळण्यासाठी शिरोता वनपरिक्षेत्रात नैसर्गिक टाक्यांमध्ये पाणी सोडले जात आहे.

अनेक ठिकाणी नैसर्गिक दगडी टाके आहेत. त्यामध्ये पाणी सोडल्यास प्राण्यांना तिथे पाणी पिता येईल. वन विभागाकडून टँकर द्वारे पाणी सोडले जात आहे. वन्यजीव रक्षक मावळ संस्था आणि इतर सर्व स्तरातून या उपक्रमाचे कौतुक होत आहे.

### हडपसरमधील शिर्के कंपनी, भीमनगर भागात

# आढळराव पाटील यांचा मतदारांशी गाठीभेटी



**हडपसर : प्रतिनिधी**

हडपसरमधील भीमनगर, घोरपडी, मुंढवा भागात शिरूर लोकसभा मतदारसंघातील उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी मतदारांशी गाठीभेट घेत मतदारांशी संवाद साधत महायुती पंतप्रधान नरेंद्र मोदीला पंतप्रधान करण्यासाठी घडळ्याला मतदान करण्याचे आवाहन करीत होते.

माजी नगरसेवक हिमाली नवनाथ कांबळे यांनी उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांचा सत्कार करुन आम्ही महायुतीच्या उमेदवाराचा प्रचार करु असे सांगितले. यावेळी भीमनगर येथे माजी नगरसेवक प्रशांत म्हस्के यांनी जंगी स्वागत करीत आढळराव पाटील यांचे स्वागत केले.

शिरूर मतदार संघाचे उमेदवार माजी खासदार शिवाजीराव आढळराव पाटील यांच्या प्रचार फेरीत हडपसर आमदार चेतन तुपे पाटील, माजी आमदार योगेश टिळेकर, माजी नगरसेवक उमेश गायकवाड, चंद्रकांत कवडे, हडपसर अध्यक्ष शंतनु जगदाळे, संदिप दळवी , बाबा बीडकर, लिंबोनी वाघमारे, आशा सावंत , लक्ष्मी सरवदे, महादेव कांबळे , राजू कांबळे,महायुती पक्षाचे प्रमुख पदाधिकारी कार्यकर्ते प्रचारात सहभागी झाले होते.

उमेदवार शिवाजीराव आढळराव पाटील यांनी हडपसर भागातील मुंढवा, भीमनगर, बीटी.कवडेरोड, शिंदेवस्ती, जहांगीरनगर आदी भागात मतदार व महायुतीतील प्रमुख पक्षाचे पदाधिकारी यांच्याशी संपर्क साधून निवडून आणण्यासाठी मतदान करण्यासाठी आवाहन करीत होते.

# मंगेश हुलावळे व शरद कुटे खरेदी-विक्री संघाच्या तज्ज्ञ संचालकपदी




**नवनिर्वाचित तज्ज्ञ संचालक मंगेश हुलावळे व शरद कुटे यांचा सन्मान करताना माजी सभापती शरद हुलावळे, पंढरीनाथ ढोरे, शिवाजी असवले, अमोल भोईरकर व सर्व संचालक.**

**वडगाव मावळ :** मावळ तालुका सहकारी खरेदी विक्री संघाच्या तज्ज्ञ संचालक पदी मंगेश हुलावळे व शरद कुटे यांची आज नियुक्ती करण्यात आली.

खरेदी विक्री संघाचे सभापती शिवाजी असवले, उपसभापती अमोल भोईरकर यांच्या प्रमुख उपस्थितीत आज झालेल्या संचालक मंडळाच्या सभेत तज्ञ संचालक निवड प्रक्रिया पार पडली. यावेळी महायुती नेत्यांच्या सूचनेनुसार हुलावळे व कुटे यांची नियुक्ती करण्यात आली.

यावेळी, संघाचे संचालक किरण हुलावळे, बाजीराव वाजे, एकनाथ येवले, माणिक गाडे, रुपेश घोजगें, गणेश विनोदे, प्रमोद दळवी, रमेश भूरुक, शहाजी कडू, ज्ञानेश्वर निंबळे, विष्णू घरदाळे, शरद नखाते, मधुकर जगताप, आशा खांडभोर, मनीषा आंबेकर, सुनीता केदारी, सचिव किरण लोहर उपस्थित होते.

दरम्यान, महिन्यापूर्वी झालेली खरेदी विक्री संघाची निवडणूक ही महायुतीच्या माध्यमातून लढविण्यात आली होती, निवडणुकीच्या वेळी महायुती नेत्यांच्या आवाहनाला प्रतिसाद देऊन सहकार्य केलेल्या कार्यकर्त्यांना तज्ञ संचालक पदी संधी देण्याचा निर्णय घेण्यात आला होता, त्यानुसार आज हुलावळे व कुटे यांची नियुक्ती करण्यात आली असून आगामी पाच वर्षाच्या कार्यकाळात विविध कार्यकर्त्यांना संधी दिली जाणार असल्याचे नेत्यांनी सांगितले.

# भाजपने देशातील जनतेची फसवणूक केली; महाविकास आघाडीचा आरोप

**राजदंड न्यूज नेटवर्क**

**पुणे :** मागील दहा वर्षाच्या सत्ता काळात भाजप सरकारने इलेक्ट्रोल बॉन्ड, नोटबंदी या माधमातून मोठा भ्रष्टाचार केला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि भाजप नेत्यांनी मोठमोठ्या घोषणा केल्या मात्र त्या पूर्ण केल्या नाहीत. घोषणा करून जनतेला फसवणाऱ्या भाजपच्या पायाखालची वाळू आता घसरू लागली आहे, त्यामुळे पुणे लोकसभा मतदार संघाच्या बाहेरील उमेदवार एमआयएम व वंचितच्या माध्यमातून उभे करण्यात आले, असा आरोप महाविकास आघाडीतील प्रमुख पक्षांच्या शहराध्यक्षांनी केला.

महाविकास आघाडीचे उमेदवार रविंद्र धंगेकर यांच्या प्रचारार्थ काँग्रेस भवनमध्ये आयोजित पत्रकार परिषदेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष अरविंद शिंदे, राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे शहराध्यक्ष प्रशांत जगताप, शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) शहरप्रमुख गजानन थरकुडे, माजी महापौर कमल व्यवहारे, माजी नगरसेवक रफीक शेख, अजित दरेकर उपस्थित होते.

अरविंद शिंदे म्हणाले, भाजपने इलेक्ट्रोल बॉन्ड आणि नोटबंदीच्या माध्यमातून मोठा भ्रष्टाचार केला आहे. विरोधकांवर बोलणारे भाजप नेते या दोन विषयांवर शब्द काढत नाहीत. जे पंतप्रधान दहा वर्षात पत्रकारांना उत्तर देवू शकले नाहीत, मग ते जनतेला काय खरे बोलणार. दहा वर्ष जनतेला फसवणारे भाजप आज विकासाच्या नाही तर प्रभू श्रीरामाच्या नावाने मते मागत आहे. पुण्याचे उमेदवारही रामाचे नाव घेवून मते मागत आहेत.




मात्र पुणेकर व देशातील सर्व मतदार या निवडणुकीत राम मंदिरावर नाही तर विकासावर मतदान करतील. भाजपच्या पायाखालची वाळू घसरत आहे. त्यामुळे भाजपने वंचित व एमआयएमला निवडणुकीच्या रिंगणात उतरवले. ते कसे उभे केले हे त्यांनात माहित. यांना पुणे मतदारसंघात उमेदवार मिळाला नाही, म्हणून दोन्ही उमेदवार शिरुर मतदार संघातून आयात केले. या दोन पक्षाला मत म्हणजे भाजपला मत, हे दलित आणि मुस्लिम समाजाला कळून चुकले आहे. त्यामुळे या निवडणुकीत मतदान करताना पुणेकर महागाई, बेरोजगारी व शहरातील ढासळलेला कायदा व सुव्यवस्थेचा डोळ्यासमोर ठेवून धंगेकर यांना निवडून देतील, अशा विश्वास शिंदे यांनी व्यक्त केला.

प्रशांत जगताप म्हणाले, भाजपचे जे उमेदवार आहेत ते महापालिकेत स्थायी समिती अध्यक्ष होते, महापौर होते. या काळात त्यांनी पुणेकरांचे प्रश्न सोडवण्यापेक्षा वेगवेगळ्या टेंडरमध्येच लक्ष घातले. भाजपने समान पाणीपुरवठा योजनेच्या माध्यमातून डोळ्यात धुळफेक केली आहे. विविध योजनेच्या नावाखाली पुणेकरांना फसवण्याचे काम केले आहे. आता निवडणुकीच्या काळात महायुतीला शहरात मुळशी पॅटर्न आणायचा आहे, असेहीते म्हणाले.

गजानन थरकुडे म्हणाले, भाजपने कोथरुडमधून पालकमंत्री, खासदार दिले. कोथरूडला सत्ताकेंद्र केले. तरीही कोथरुडचा विकास झाला नाही. कोथरुडचा जो विकास झाला तो माजी मंत्री शशिकांत सुतार यांच्याच काळात झाला. चंद्रकांत पाटील पालकमंत्री असताना काय कामे केली त्यातील केवळ चार कामे त्यांनी सांगावीत. विकासाचे गाजर दाखवून निवडणुक लढवली जात आहे. सुनेला पाठवा दिल्लीत लेकीला ठेवा गल्लीत अशी डॉ. निलम गोऱ्हे यांच्या टिकेचा समाचार घेताना थरकुडे म्हणाले, गोऱ्हे यांना स्वत:ला नगरसेवक म्हणून निवडून येतायेत नाही, ना त्या एक नगरसेवक निवडून आणू शकत नाहीत. तरीही शिवसेनेने त्यांना गेल्या २० ते २२ वर्षे विधान परिषदेच्या आमदार केले.

# श्रीरामांच्या जयघोषाने दुमदुमला गोदाकाठ

**नाशिक :** विविध ढोलपथकांचा जल्लोष... रांगोळीने सजविण्यात आलेले रस्ते... सुवासिनींकडून रथाचे ओवाळून केले जाणारे स्वागत आणि विविध मंडळांसह भाविकांकडून होत असलेल्या रामनामाचा जयघोष अशा वातावरणात सायंकाळी साडेसहा वाजता कामदा एकादशीला काळाराम मंदिर पूर्व दरवाजा येथून पारंपरिक पद्धतीने श्रीराम आणि गरुड रथयात्रा काढण्यात आली.

अवघ्या नाशिकचा ग्रामोत्सव म्हणून ओळख असलेल्या रथोत्सवाला हजारो भाविकांनी हजेरी लावल्याने रामभक्तांचा उत्साह शिगेला पोहोचल्याचे दिसून आले. यंदाचे उत्सवाचे मानकरी असलेल्या राघवेंद्रबुवांना पांढरा फेटा बांधण्यात आला. परंपरेनुसार मानकरी रवींद्र दीक्षित, नंदन दीक्षित यांना निमंत्रण देण्यात आले. नारळ वाढवून आरती करून हनुमान मूर्ती



मंदिराबाहेर काढण्यात आली. श्रीराम मूर्ती, चांदीच्या पादुका हातात घेऊन राघवेंद्रबुवा यांनी मंदिराला एक प्रदक्षिणा घालून मूर्ती चांदीच्या पालखीत ठेवली. त्यानंतर संध्याकाळी साडेसहा वाजता काळाराम मंदिराच्या पूर्व प्रवेशद्वाराबाहेर उभे असलेले दोन्ही रथ ओढून रथोत्सवाला सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रभू रामचंद्रांच्या जयघोषाने अवघी पंचवटी दुमदुमली होती.

रथोत्सवासाठी पोलिस आयुक्त संदीप कर्णिक, आमदार राहुल ढिकले, राजाभाऊ वाजे, महंत भक्तिचरणदास, खासदार हेमंत गोडसे, दशरथ पाटील, लक्ष्मण सावजी, रंजन ठाकरे, माजी आमदार बाळासाहेब सानप, गुरुमित बग्गा, डॉ. सुनील ढिकले, शेखर ढिकले, पोलिस उपायुक्त किरणकुमार चव्हाण आदी उपस्थित होते.

गरुड रथाचे रोकडोबा पटांगणात आगमन झाल्यावर आरती करण्यात आली. त्यानंतर गरुड रथ शहराच्या दिशेने मार्गस्थ झाला, तर श्रीराम रथ नदी पार करीत नसल्याने तो गौरी पटांगणात उभा राहिला. शहराची प्रदक्षिणा करून गरुड रथाचे गौरी पटांगणात आगमन झाले असता या ठिकाणी फटाक्यांची मोठ्या प्रमाणात आतषबाजी करण्यात आली. गरुड रथ ओढण्याचा मान अहिल्याराम व्यायामशाळेकडे तर राम रथ ओढण्याचा मान सरदार रास्ते तालीम संघ व समस्त पाथरवट समाजाकडे होता.

गरुड रथाचे सूत्रसंचालन चंदन पूजाधिकारी, तर रामरथाचे सूत्रसंचालन नंदकुमार मुठे यांनी केले.रथोत्सवाच्या अनेक ठिकाणी स्वागत होत असताना अनेक ठिकाणी व्यासपीठावर राम, सीता, हनुमान व लक्ष्मण वेशात मुले सजली होती; तर मिरवणुकीतही सीतेसह रामाची वेशभूषा परिधान केलेले कलावंत भाविकांचे लक्ष वेधून घेत होते.

## दोन्ही रथ रामकुंडावर आल्यानंतर अभिषेक

**दोन्ही रथांचे आगमन रामकुंड येथे झाल्यावर उत्सवमूर्तींची अमृतपूजा, पंचामृत अभ्यंगस्नान, अवभृत स्नान आणि महापूजा करण्यात आली. रथोत्सवाच्या दिवशी भाविकांनादेखील या उत्सवमूर्तींना स्नान घालण्यासाठी परवानगी दिली जाते. वर्षातील एकच असा हा दिवस असतो की, यावेळी काळाराम मंदिरात असलेल्या उत्सवमूर्तींना सामान्य नागरिक स्नान घालू शकतो; त्यामुळे या ठिकाणी भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती.**

# विजेच्या कडकडाट अन् वादळी वाऱ्यासह सोलापुरात जोरदार पाऊस

विजेच्या कडकडाट अन् वादळी वाऱ्यासह दरम्यान, शनिवारी सकाळपासूनच उकाडा जाणवत होता. पावसाची शक्यता वर्तविण्यात येत होती.

दुपारनंतर सोलापूर शहरासोबतच अचानक परिसरात वातावरणात बदल झाला. आभाळात ढग दाटून आले होते. दुपारी अक्कलकोट भागात पावसाला सुरूवात झाली. तीन वाजल्यापासून शहरात वादळी वारे जोरात सुटले. साडेतीन वाजण्याच्या सुमारास पावसाने जोरदार हजेरी लावली. साधारण: वीस मिनिटे जोरदारपाऊसबरसत होता. भवानी पेठ, घोंगडे वस्ती भाजी मंडई परिसरात, होटगी रोड, कुमठा नाका, सात रस्ता, मोदी, सात रस्ता आदी परिसरात पावसानं हजेरी लावली. अवकाळी पावसानंतर पुन्हा सुर्यदर्शन झाल्याचे पहावयास मिळाले.



# शरद पवारांवर राधाकृष्ण विखे पाटील यांची टीका

**अहमदनगर :** शरद पवारयांनी लंके यांच्या उमेदवारीबाबत केलेल्या विधानाला आपण फारसे महत्व देत नाही, असे सांगत खोट बोलणे हा पवारांचा धंदाच झाला आहे. खोट बोलपण रेटून बोल, अशी त्यांची अवस्था आहे, अशी टीका पालकमंत्रीराधाकृष्ण विखे पाटीलयांनीशरद पवारयांच्यावर लोणी येथे शनिवारी माध्यमांशी बोलताना केली. तसेच त्यांनी पवार यांच्यामुळेच अहमदनगर जिल्ह्याची अधोगती झाली आहे, असा आरोप केला आहे.

आमदार निलेश लंके यांना उमेदवारी देऊ नका, म्हणून



महसूलमंत्र्यांनी निरोप पाठवला होता, असा गोप्यस्फोट शरद पवार यांनी शुक्रवारी नगरमधील गांधी मैदानात झालेल्या सभेत केला होता. त्याला पालकमंत्री विखे पाटील यांनी प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले, शरद पवार यांच्या विधानाला मी फारसे महत्व देत नाही. कारण खोट बालणे हा त्यांचा धंदाच झाला आहे.

# ओखा-मदुरै साप्ताहिक विशेष जूनअखेरपर्यंत धावणार!

**अकोला :** प्रवाशांची वाढती गर्दी लक्षात घेता, पश्चिम रेल्वेने ओखा-मदुरै-ओखा साप्ताहिक विशेष एक्स्प्रेसला मुदतवाढ देण्याचा निर्णय घेतला आहे. प्रवाशांच्या सोयीसाठी ही साप्ताहिक रेल्वे आता २८ जूनपर्यंत धावणार आहे. या गाडीला अकोला येथे थांबा असल्याने अकोलेकर प्रवाशांची सोय होणार आहे.

पश्चिम रेल्वेतील सूत्रांकडून प्राप्त माहितीनुसार, २५ मार्च



२०२४ पर्यंत अधिसूचित असलेली ०९५२० ओखा-मदुरै साप्ताहिक विशेष एक्स्प्रेस २४ जून २०२४ पर्यंत दर सोमवारी २२:०० वाजता प्रस्थान स्थानकावरून रवाना होऊन चौथ्या दिवशी मदुरै स्थानकावर ११:४५ वाजता पोहोचणार आहे.

२९ मार्च २०२४ पर्यंत अधिसूचित असलेली ०९५१९ मदुरै-ओखा साप्ताहिक विशेष एक्स्प्रेस २८ जून २०२४ पर्यंत दर शुक्रवारी १:१५ वाजता स्थानकावरून रवाना होऊन तिसऱ्या दिवशी १०:२० वाजता ओखा स्थानकावर पोहोचणार आहे. या गाडीच्या अप व डाऊन मार्गावर प्रत्येकी चार अशा एकूण आठ फेऱ्या होणार आहेत.

# नेत्यांना व्हीजन नसल्याने कोल्हापूरचे पर्यटन अडखळले

**कोल्हापूर :** देशातील ५१ शक्तिपीठांतील देवता असलेली अंबाबाई, जोतिबा, खिद्रापूर, नृसिंहवाडीसह धार्मिक अधिष्ठान लाभलेला जिल्हा, विशाळगड, पावनखिंड, पन्हाळासारखे गडकिल्ले, आंबा, आंबोलीसारखे घाट, शेती व पूरक व्यवसायातून ग्रो टुरिझम, संस्थान विकासाचे रोल मॉडेल तयार केलेले राजर्षी छत्रपती शाहू महाराजांच्या कोल्हापुरातपर्यटनाचाभरभरून वारसा असताना त्याचा डंका वाजवण्यात येथील राजकीय नेतृत्व अपयशी ठरले आहे.

पर्यटनासाठीउपयुक्त सर्व क्षमता असताना केवळ नेत्यांमध्ये या क्षेत्राचा विकास व उत्पन्नवाढीसाठी उपयोग करून घेण्याच्या दूरदृष्टीचा अभाव आहे. त्यामुळेच केंद्र-राज्य शासनाच्या योजना, निधीद्वारे या स्थळाचा ठोस विकास नेत्यांनी न केल्याने पर्यटनाच्या नकाशावरकोल्हापूरचीपाटी कोरीच राहिली आहे. त्यामुळेच कोल्हापूर म्हटलं की फक्त तांबडा-पांढरा रस्सा एवढेच चित्र समोर येते, अजून दहा चांगल्या गोष्टी जगाला सांगण्यात आम्ही मागे राहिलो



आहे.

कोल्हापूरला निसर्गाने भरभरून दान दिले आहे, हिमालय आणि समुद्र आणि वाळवंट सोडला, तर जिल्ह्यात सगळे आहे. गडकिल्ले, धार्मिक अधिष्ठान. राजर्षी शाहू महाराजांनी बांधलेले धरण, क्रीडा, कला, साहित्य, संस्कृती, चित्रपटसृष्टीचा वारसा. रंकाळा हे तर कोल्हापूरची वैशिष्ट्ये; पण जिल्ह्यामध्येही प्रकाशात न आलेली किंवा आलेली अनेक पर्यटन, ऐतिहासिक वारसा स्थळे आहे. मेट्रो सिटीमधील पर्यटकांना आकर्षित करणारे कृषी व कृषी पर्यटन, पावसाळी पर्यटन, उद्योजकीय दृष्टीने मधाचे गाव पाटगावसारखी अनेक गावे त्यांच्या वैशिष्ट्यांनी परिपूर्ण आहेत. त्यांचा विकास, सोयीसुविधा निर्माण करून त्या माध्यमातून स्थानिकांना रोजगार देण्याची व पर्यटनाला उद्योगामध्ये रूपांतरित करण्याची दूरदृष्टी आजवर एकाही खासदाराला लाभली नाही. केंद्राकडून जिल्ह्यातील पर्यटन स्थळासाठी भरभरून निधी आणला आहे, त्यातून त्याचा विकास होऊन ते रोल मॉडेल ठरले आहे, असे एकही ठोस काम आतापर्यंतच्या नेत्यांनी केले नाही.

शेतीनंतरचे पर्यटन हा कोल्हापूरचा दुसऱ्या क्रमांकाचा उद्योग आहे; पण त्याकडे आजवर दुर्लक्षच झाले आहे. शहर वगळता जिल्ह्यातील खिद्रापूरसारखी ठिकाणे लोकांना शोधत जावी लागतात. पर्यटन उद्योग वाढवायचा असेल तर अशा ठिकाणी जाण्यासाठी दळणवळणासाठी चांगले रस्ते, वाहतूक व सोयीसुविधा, स्थानिकांचा रोजगार वाढवणारे लघु उद्योग तेथे निर्माण करणे गरजेचे आहे. जिल्ह्याचा स्वतंत्र पर्यटन विकास आराखडा तयार झाला पाहिजे. शासनाचा निधी आणि स्थानिकांच्या सहभागातून पाच वर्षांत जिल्ह्यातील किमान ५ पर्यटन स्थळे पूर्णत: विकसित करायची आणि तेथे पर्यटन उद्योग सुरू झाला पाहिजे असे टार्गेट ठेवून काम केले पाहिजे. पर्यटकांना रस्ते, सोयीसुविधा, निवासस्थाने, माहिती व मार्गदर्शन केंद्र एवढ्या गोष्टी देणे गरजेचे आहे.

पर्यटन स्थळांची माहिती लोकांपर्यंत पोहोचविण्यासाठी ब्रँड प्रमोशन केले पाहिजे. नैसर्गिक पर्यटनस्थळे आणि विकसित केलेल्या पर्यटन स्थळांसह पर्यटनाच्या १० पैकी ७ ते आठ निकषात आपण बसतो.

## नागालँडमधील सहा जिल्ह्यांत शून्य टक्के मतदान

**दिल्ली :** लोकसभा निवडणुकीसाठी देशात एकूण सात टप्प्यात मतदान होणार आहे. यापैकी पहिल्या टप्प्यातील मतदान आज (१९ एप्रल) पार पडले. देशात जवळपास १०२ लोकसभा मतदारसंघांमध्ये आज मतदान झाले. आता कोणत्या मतदारसंघात किती टक्के मतदान झाले? याची आकडेवारी समोर येत आहे. असे असतानाच नागालँडमध्ये एक वेगळी परिस्थिती पाहायला मिळाली. या राज्यातील तब्बल सहा जिल्ह्यांमध्ये शून्य टक्के मतदान झाले आहे.

नागालँडच्या सहा जिल्ह्यांमध्ये एकाही मतदाराने मतदानाचा हक्क बजावला नाही. त्यामुळे येथील सर्व मतदान केंद्रे दिवसभर ओस पडल्याचे चित्र पाहायला मिळाले. या राज्यातील ईस्टर्न नागालँड पीपल्स ऑर्गनायझेशनने मतदान करण्यावर बहिष्कार टाकण्याचे आवाहन केले होते. या आवाहनाला मतदारांनी पाठिंबा देत बहिष्कार टाकला. त्यामुळे सहा जिल्ह्यात शून्य टक्के मतदान झाले.

नागालँडमध्ये पूर्वेकडील मोन, तुएनसांग, लोंगलेंग, नोक्लाक, शामटोर आणि किफिरे हे सहा जिल्हे आहेत. आता नागालँडमध्ये सध्या भाजपा सत्तेत आहे. मात्र, या सहा जिल्ह्यांसाठी सरकारने दिलेले आश्वासने पाळले नाहीत.

# कळमन्यात सुरक्षेमुळे धान्य व्यापाऱ्यांची दुकाने उघडली नाही

**नागपूर:** कळमना कृषी उत्पन्नबाजारसमितीच्या न्यू ग्रेन मार्केट परिसरातील काही दुकाने प्रशासनाने सुरक्षेच्या कारणांनी सकाळी बंद ठेवली. त्यामुळे या परिसरात वाहतुकीची कोंडी झाली. शिवाय परिसरातून वाहने बाहेर काढण्यासाठी लोकांना कसरत करावी लागली. असुविधेचा व्यापारी, ग्राहक आणि अडतियांना त्रास सहन करावा लागला. सुरक्षेच्या दृष्टीने आम्ही प्रशासनाला सहकार्य करीत असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले. नागपूरआणि रामटेक लोकसभा निवडणुकीत उपयोगात आलेल्या सीलबंद इव्हीएम मशीन्स सुरक्षेत ठेवण्यासाठी कळमना कृषी उत्पन्न समितीच्या न्यू ग्रेन मार्केट परिसरात स्ट्राँग रूम तयार करण्यात आली आहे. स्ट्राँग रूमच्या सुरक्षेसाठी मोठी सुरक्षा व्यवस्था करण्यात आली आहे. शुक्रवारी मतदान झाले. शनिवार सकाळपासूनच सीलबंद इव्हीएम मशीन्स बंदोबस्तात कळमन्यात येणे सुरू झाले. सुरक्षेसाठी आजूबाजूला परिसर बंद करण्यात आला. स्ट्राँग रूमच्या बाजूला असलेली न्यू ग्रेन मार्केटमधील जवळपास १५ दुकाने बंद करण्यात आली. त्यामुळे व्यापाऱ्यांमध्ये रोष निर्माण झाला आणि दुकाने सुरू करण्याची मागणी केली. अधिकाऱ्यांनी त्यांची समजूत घालत सुरक्षेच्या कारणांनी केवळ काहीच तासासाठी दुकाने बंद करण्यात आल्याचे सांगितले. अखेर सायंकाळी ५ च्या सुमारास दुकाने

### स्ट्राँग रूममध्ये इव्हीएम मशीन्स



सुरू झाली. त्यानंतर व्यवसाय पूर्ववत सुरू झाला. रविवारी न्यू ग्रेन मार्केट बंद असते. त्यामुळे दुकाने उघडण्याचा प्रश्नच नाही. सोमवारी नेहमीप्रमाणे दुकाने सुरू राहतील, असे अधिकाऱ्यांनी नाव न सांगण्यात अटीवर सांगितले.

**सर्वबाजारपेठासुरू**

शनिवारी भाजीपाला, फळ, धान्य बाजारपेठा सुरू होत्या. त्यामुळे रात्रीपासूनच माल ट्रकमध्ये येण्यास सुरुवात झाली. सकाळी १० च्या आत माल खाली केलेले ट्रक गेटबाहेर गेले. त्यानंतर सुरक्षेच्या कारणांनी सर्वांना अडविण्यात आले. अखेर इव्हीएम मशीन्स स्ट्राँग रूममध्ये सुरक्षित पोहोचल्याची खातरजमा केल्यानंतर वाहने गेटबाहेर नेण्यास परवानगी देण्यात आली. हा शनिवारी केवळ काही तासाचा प्रश्न होता, असे अधिकारी म्हणाले.

**दुकाने बंद होण्याची माहिती नव्हती**

स्ट्राँग रूम न्यू ग्रेन मार्केटमध्ये बनविण्यात आली आहे. इव्हीएम मशीन्स स्ट्राँग रूममध्ये आणताना लगतची दुकाने बंद करण्यात आली. त्यामुळे व्यापाऱ्यांमध्ये रोष होता. शिवाय बाहेरून आलेल्या ग्राहकांनी संताप व्यक्त केला. मशीन्स स्ट्राँग रूममध्ये ठेवल्यानंतर सायंकाळी ५ च्या सुमारास दुकाने सुरू झाली. याची कल्पना अधिकाऱ्यांनी आधी द्यायला हवी होती.

रमेश उमाटे, व्यापारी, न्यू ग्रेन मार्केट.धान्य खरेदी न करताच परतलो


कळमन्यात स्ट्राँग रूमच्या आजूबाजूला पोलिसांचा कडकोट बंदोबस्त असून अखेर धान्य खरेदी न करता घरी परतलो. सकाळी १२ च्या सुमारास धान्य बाजारात खरेदीसाठी गेलो, असता पोलिसांनी बाहेर अडविले. तेव्हा वाहतुकीची कोंडी झाली होती. त्या कोंडीत फसल्यामुळे एक तास कार अडकून होते. संबंधित दुकान बंद असल्याने खरेदीविना घरी परतलो.

# तहात हरले! अजित पवारांच्या राष्ट्रवादीत नाराजी?

**नाशिक :** साताऱ्यासह चार जागा घालविल्याशरद पवार यांच्याशी फारकत घेऊन राष्ट्रवादी पक्षच ताब्यात घेणारे उपमुख्यमंत्री अजित पवारआज अस्तित्वाचे युद्ध लढत आहेत.

अजित पवारमहायुतीत गेले खरे परंतु जागावाटपाच्या तहात बऱ्याच महत्वाच्या जागा गमवाव्या लागल्या आहेत. ओपिनिअन पोलनुसार तर त्यांना बारामतीच्या जागेसह चारही जागा जिंकण्याची शक्यता नाहीय. त्यातचनाशिकचीआणि साताऱ्याची जागाही गेल्याने राष्ट्रवादीत अजित पवारांविरोधात नाराजीचा सूर उमटू लागल्याचे वृत्त आहे.

साताऱ्याची जागा राष्ट्रवादीतून उदयनराजे भोसले लढवत होते. त्यांनी अंतर्गत राजकारणातून पक्षाचा आणि खासदारकीचा राजीनाम देत भाजपात प्रवेश केला होता. यानंतरच्या पोटनिवडणुकीत उदयनराजेंचा पराभव झाला होता. तर राष्ट्रवादीचा उमेदवार निवडून आला होता. तरीही साताऱ्याची जागा राष्ट्रवादीने भाजपला सोडली.त्यापूर्वीच्या जागावाटपांच्या चर्चांत गडचिरोली, परभणी सारख्या जागा अजित पवारांनी महायुतीच्या दबावाला बळी पडून सोडल्याची नाराजी आहे. तर साताऱ्याबरोबरचनाशिकमध्येहीअजित पवार कमी पडले अशी भावना राष्ट्रवादीच्या कार्यकर्त्यांमध्ये,



नेत्यांमध्ये बळ धरू लागली आहे. दुसरीकडे अजित पवार, तटकरे आणि पटेल हे तिघेच निर्णय घेतात, कोणाला विचारात घेत नाहीत असा सूरही काही जणांमध्ये आहे. याबाबतचे वृत्त एबीपी माझाने दिले आहे.नाशिकच्या उमेदवारीसाठीछगन भुजबळयांनी देवेंद्र फडणवीस आणि भाजपा प्रदेशाध्यक्ष बावनकुळे यांना फोन केला होता. दोघांनीही मोदी आणि अमित शाह यांनी भुजबळांना नाशिकमध्ये उमेदवारी द्या असे सांगितल्याचे म्हटले होते. परंतू, याला १५ दिवस लोटले तरी उमेदवारी जाहीर होत नाही, यामुळे नाराज होऊन भुजबळांनीच दावा मागे घेत असल्याचे जाहीर केले. नाशिक मागण्यात देखील पवार कमी पडल्याचा दावा केला जात आहे.दुसरीकडे शिंदे गटातही नाराजी असल्याचे बोलले जात आहे.

शिंदेंचे मंत्री सावंत यांनी काल अजित पवारांसमोरच भर व्यासपीठावर एकेक जागा कमी होऊ लागल्या तर शांत बसणार नाही, असा इशारा दिला होता. या सगळ्यात राष्ट्रवादीची चांगलीच फरपट झालेली दिसत आहे. राष्ट्रवादीला चारच जागा घेऊन लढावे लागत आहे. त्यात देखील दोन उमेदवार उमेदवारीसाठी आयात केलेले आहेत. अजित पवारांनी बारामतीत निवडणूक प्रतिष्ठेची केल्याने पत्नीला निवडून आणण्यासाठी सर्व ताकद तिकडेच खर्च करावी लागत आहे. कारण अजित पवारांचे कुटुंब एकीकडे आणि शरद पवार व अन्य पवार फॅमिली दुसरीकडे असे झाले आहे. यामुळे सर्व पवार कुटुंबीय अजित पवारांच्या विरोधात प्रचार करू लागले आहेत. चुलते बाजुलाच इथे सख्खेही अजित पवारांच्या विरोधात मत मांडत प्रचार करत आहेत. आता अजित पवार या सगळ्याला पुरून उरणार की अस्तित्व गमावणार यावर येत्या ४ जूनलाच प्रकाश पडणार आहे.

## मोदी तिसऱ्यांदा सत्तेत आल्यास ३०० युनिट वीज मिळणार मोफत

**धाराशिव :** पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे देशात तिसऱ्यांदा सरकार आले तर ३०० युनिटपर्यंत मोफत वीज मिळणार, असे राज्याचे उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी आज धाराशिव येथील प्रचार सभेत म्हटले.

यावेळी बोलताना ते म्हणाले, पाठीमागच्या काळामध्ये आम्ही सरकारमध्ये असताना गरिबांना वीजबिल माफी केली होती. सुशीलकुमार शिंदे त्यावेळी मुख्यमंत्री होते. त्या मुद्द्यावर निवडणूक जिंकली आणि पहिले बिल शून्याचे दिले. मात्र नंतर पुन्हा आधीसारखे बिल देण्यास सुरुवात झाली. असे करणे परवडत नाही. मात्र मोदी हे कोणतेही काम करतात, मग ते मागील पुढील विचार करून करतात.

''राज्यात कार्यक्रमासाठी जेव्हा मोदी येतात, त्यावेळी राज्याचे प्रतिनिधी म्हणून त्यांच्याशी संवाद साधण्याची आम्हाला संधी मिळते. आम्ही त्यांच्याशी चर्चा करतो. आता ३०० युनिटपर्यंत जे वीज वापरतात, त्यांना येथून पुढे तिसऱ्यांदा मोदींचे सरकार आल्यावर वरील युनिटपर्यंत मोफत वीज मिळणार आहे.''असेही अजित पवार यांनी यावेळी सांगितले.

देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे विकास पुरुष आहेत. विकासासाठी आम्ही महायुती मधून लढतोय. विकासाकरिता आम्हाला राज्याचा देखील विकास करून घ्यायचा आहे. केंद्राचा मोठ्या प्रमाणात निधी आम्हाला या कामासाठी लागणार आहे, असेही ते म्हणाले.

# सातारा लोकसभा प्रबंधन समितीचे कार्य उत्कृष्ट

## निवडणुकीचे योग्य व्यवस्थापन केले जाईल - निर्मल कुमार सुराणा



**राजदंड / सातारा**

महायुतीच्या प्रचारात, निवडणुकीच्या नियोजनासाठी लोकसभा प्रबंधन समिती चांगले कामं करेल, असा विश्वास भा.ज.पा. महाराष्ट्र प्रदेश निवडणूक सहप्रभारी निर्मल कुमार सुराणा यांनी व्यक्त केला.

महायुतीचे सातारा लोकसभेचे अधिकृत उमेदवार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांच्या निवडणुकीच्या आणि प्रचाराच्या नियोजनासाठी भारतीय जनता पार्टीच्या सातारा लोकसभा प्रबंधन समितीची बैठक हॉटेल लेक व्ह्यू सातारा येथे संम्पन्न झाली.

भा.ज.पा. महाराष्ट्र प्रदेश निवडणूक सह प्रभारी निर्मल कुमार सुराणा यांच्या अध्यक्षते खाली झालेल्या या बैठकीसाठी, पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंदभाऊ देशपांडे, प्रदेश उपाध्यक्ष विक्रमजी पावसकर, भाजपा जिल्हाध्यक्ष धैर्यशील दादा कदम, विनीतजी कुबेर, ॲड डी जी बनकर तसेच सातारा लोकसभा निवडणूक प्रबंधन समितीचे सदस्य उपस्थित होते.

भारतीय जनता पार्टीने लोकसभा निवडणुकीचे व्यवस्थापन करण्यासाठी, प्रत्येक लोकसभा मतदार संघासाठी एक निवडणूक प्रबंधन समिती तयार केली आहे, या समितीमध्ये कॉल सेंटर प्रचार सामग्री व्यवस्था वाहन व्यवस्था सोशल मीडिया आणि हायटेक अभियान प्रवास करणाऱ्या कार्यकर्त्यांचे व्यवस्थापन, प्रिंट- इलेक्ट्रॉनिक आणि लोकल यूट्यूब चैनल मीडिया व्यवस्थापन,प्रचार आणि इतर साहित्य जुळवणे एकत्र करणे काही कायदेशीर बाबींचे सल्ले निवडणुकी मधील हिशोब व्यवस्था पाहणे, स्टार प्रचारकांचे दौरे आयोजित करणे आणि सर्वात महत्त्वाचे म्हणजे बूथ मधील प्रचाराचे नियोजन करणे, यासाठी पूर्ण लोकसभा मतदारसंघातील कार्यकर्ते पदाधिकारी यांच्या समित्या तयार केले आहेत, या समित्या लोकसभा स्तरावर आणि विधानसभा स्तरावर गेले दोन महिने काम करत आहेत, त्यांनी केलेल्या कामाचा आढावा घेणे आणि पुढील कामासाठी सूचना देण्यासाठी आजची ही महत्त्वाची बैठक आयोजित केली होती.

जिल्हाध्यक्ष धैर्यशील दादा कदम यांनी सर्वांचे स्वागत केले आणि सातारा जिल्ह्यातील भाजपा संघटना आणि निवडणूक प्रबंधन समितीची माहिती दिली, प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावस्कर यांनी बूथ रचना चार्ज केल्याने निवडणूक सुकर होईल आणि याचे महत्व सांगितले,ॲड डी जी बनकर यांनी संपूर्ण निवडणूक प्रक्रियेत महायुती मधील सर्व पक्षांच्या पदाधिकाऱ्यांशी योग्य समन्वय साधला जाईल आणि सर्वजण मिळून या निवडणुकीत विजय संपादन करू अशी ग्वाही दिली.

पश्चिम महाराष्ट्र संघटन मंत्री मकरंद भाऊ देशपांडे यांनी प्रत्येक पदाधिकाऱ्याने आपल्यावरील इतर जबाबदाऱ्या बरोबरच आपला बूथ सक्षम करण्याकडे लक्ष देण्याची आवश्यकता बोलून दाखवली, प्रत्येकाने आपल्या बूथ वरील महायुतीच्या सर्व पक्षातील पदाधिकारी कार्यकर्त्यांना बरोबर घेऊन काम करावे, काही कारणाने जी नाराज असतील त्यांना सुद्धा बरोबर घेऊन त्यांची नाराजी दूर करावी आणि आपल्या बूथ मध्ये भारतीय जनता पार्टीचे उमेदवार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले आणि कमळ चिन्ह यांचा प्रचार करावा अशा सूचना केल्या.

भा.ज.पा. महाराष्ट्र प्रदेश निवडणूक सह प्रभारी निर्मल कुमार सुराणा यांनी सर्व समिती सदस्यांशी वैयक्तिक बोलून कामाची माहिती घेतली,कामं करताना येणाऱ्या अडचणी विचारून त्यातून मार्ग कसा काढायचा याबाबत मार्गदर्शन केले आणि येत्या पंधरा दिवसात करायच्या कामाबाबत सूचना केल्या आणि ज्या जोमाने कार्यकर्ते पदाधिकारी कामं करत आहेत त्या मुळे सातारा लोकसभा मतदार संघात महायुतीचे उमेदवार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांचा विजय निश्चित होईल असे सांगून निवडणूक प्रबंधन समितीच्या सदस्यांच्या कामाचे कौतुक केले.

# माणमधून धैर्यशील मोहिते पाटील यांना मोठं 'लिड' देणार - अनिल देसाई



**राजदंड / वडूज**

'धैर्यशील दादा, माण खटाव तालुक्यातून आम्ही तुम्हाला प्रचंड मताधिक्य देणार', अशी ठाम ग्वाही माण-खटावचे नेते आणि जिल्हा बँकेचे उपाध्यक्ष अनिल देसाई यांनी दहिवडी, ता. माण येथील आयोजित कार्यकर्ता संवाद मेळाव्यात माढा लोकसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडीचे अधिकृत उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांना दिली. देसाई गटाच्या पाठिंब्याने महाविकास आघाडीची ताकद नक्की वाढणार आहे.

ज्या प्रमाणे सन २०१४ च्या लोकसभा निवडणुकीत माण खटाव तालुक्यातील मतदारांनी विजयसिंह मोहिते पाटील दादांना मताधिक्य देवून विजयी केलं होतं, त्याच प्रमाणे तालुक्यातील प्रभाकर देशमुख, अनिल देसाई, रणजितसिंह देशमुख आणि अजून आमच्या सोबत येणारे अशा सर्वांची आमची टीम एकसंघपणे काम करून चांगला निकाल देईल. माझी उमेदवारी जाहीर झाल्यानंतर माढा मतदारसंघात अतिशय उत्साहाचं वातावरण आहे. तर फलटण मधून रघुनाथराजे नाईक-निंबाळकर व इतर आमच्यासोबत आहेत.त्यामुळे विजय निश्चित होणार असल्याचा आत्मविश्वास मतदार संघाचे उमेदवार धैर्यशील मोहिते पाटील यांनी यावेळी व्यक्त केला.

मेळाव्यास खटाव मार्केट कमिटी उपसभापती विजय शिंदे, युवा नेते महेंद्र देसाई, माण मार्केट कमिटीचे माजी सभापती उत्तम खाडे, मार्केट कमिटी माजी संचालक जालिंदर खरात, तानाजीराव मगर, अनिल सुभेदार, अण्णा मगर, पिंटू जगदाळे, रफिक मुलाणी, दादा दडस तसेच अनिल देसाई यांच्यावर प्रेम करणारे या विभागातील पदाधिकारी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# 'बिग बॉस फेम' अभिजीत बिचुकले यांचा अर्ज दाखल



**राजदंड / सातारा**

सातारा लोकसभा मतदारसंघात उमेदवारी दाखल करण्याच्या अखेरच्या दिवशी बिग बॉस फेम साताऱ्याचे अभिजीत बिचुकले यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल केला आहे. महायुती आणि महाविकास आघाडीच्या विरोधात अभिजीत बिचुकले यांनी निवडणुकीच्या रिंगणात उडी घेतली आहे.

सातारा लोकसभा मतदारसंघात उमेदवारी दाखल करण्याचा शुक्रवारी शेवटचा दिवस होता आतापर्यंत सातारा लोकसभा मतदारसंघातून आतापर्यंत उदयनराजे भोसले, शशिकांत शिंदे यांच्यासह वीस जण रिंगणात उतरले आहेत. अभिजीत बिचुकले यांनी यापूर्वी २००४, २००९, २०१४, २०१९ मध्ये सातारा लोकसभा लढली तर २००९ मध्ये सातारकर जनतेने त्यांना पाच आकडी मतदान दिले. बिचुकले यांच्या मागणीनुसारच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे नाव संसद भवनला दिले असल्याचे त्यांनी सांगितले आपण खासदार जर झालो तर अरबी समुद्रातील छत्रपती शिवरायांच्या स्मारकासाठी पाठपुरावा करू छत्रपतींचा वैचारिक वारस म्हणून जनतेने मला मतदान करावे असे आवाहन त्यांनी केले.

# कराडात नरेंद्र मोदींची ३० एप्रिलला सभा



**कराड :** सातारा लोकसभा मतदारसंघाचे महायुतीचे उमेदवार उदयनराजे भोसले यांच्या प्रचारार्थ कराड येथे ३० एप्रिल रोजी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची जाहीर सभा होणार असल्याची माहिती भाजपचे कराड शहराध्यक्ष एकनाथ बागडी यांनी दिली.

सातारा मतदारसंघातील महायुतीच्या उमेदवाराच्या निवडणूक प्रचाराचा भाजपचे प्रदेश निवडणूक सहप्रभारी निर्मलकुमार सुराणा यांनी शुक्रवारी दि. १९ रोजी कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील भाजपच्या कोअर कमिटीची बैठक आढावा घेतला. यावेळी प्रदेश उपाध्यक्ष विक्रम पावसकर, जिल्हाध्यक्ष धैर्यशील कदम, राज्य कार्यकारणी सदस्य व सातारा लोकसभा प्रभारी डॉ. अतुल भोसले, शहराध्यक्ष एकनाथ बागडी यांच्यासह अन्य पदाधिकारी व कराड दक्षिण भाजप कोअर कमिटीतील पदाधिकारी, सदस्य व कार्यकर्ते उपस्थित होते.

या बैठकीत लोकसभा निवडणुकीच्या अनुषंगाने निर्मलकुमार सुराणा यांनी कराड दक्षिण विधानसभा मतदारसंघातील आढावा घेतला.

# 'सेटरीज्' सामाजिक संस्थेच्या प्रशिक्षण शिबिरास शेतकऱ्यांचा प्रतिसाद; वरूड येथे प्रशिक्षण सुरू



**राजदंड / वडूज**

संपूर्ण भारत कार्यक्षेत्र असलेल्या आणि वृक्ष लागवड, वृक्ष संगोपन, जलसंधारण आदी विकास कामात शेतकऱ्यांना निशुल्क कायम स्वरूपी सहकार्य करणाऱ्या बंगलोर येथील 'सेटरीज्' या सामाजिक संस्थेच्या वतीने शेतकऱ्यांसाठी शेतीपूरक असलेल्या फळबागा झाडांची लागवड, संगोपन, पाण्याचा सूक्ष्म वापर, जलसंधारण आदी विविध उपक्रम असलेलं प्रशिक्षण वरुड ता खटाव येथे सुरु झालं असून पहिल्याच दिवशी खटाव तालुक्यातील २१ गावातील १०० हुन अधिक शेतकऱ्यांनी प्रशिक्षण लाभ घेतला.

विशेष म्हणजे प्रशिक्षित शेतकऱ्यांना संस्थेच्या वतीने झाडांची रोपं आणि मार्गदर्शन मोफत दिलं जातं. संस्थेचे सुमारे १३ राज्यांमध्ये विविध सोशल प्रोजेक्टस् चालू असून त्यामध्ये मियावाकी जंगल, ॲग्रो फ़ॉरेस्ट्री, सोशल फॉरेस्ट्री आणि जलसंधारण यांचा समावेश आहे.

संपूर्ण महाराष्ट्रामध्ये 'एक गाव एक जंगल' ही संकल्पना घेऊन पाऊले टाकली जात आहेत. आत्तापर्यंत १६ मियावाकी जंगलाची उभारणी केली गेली आहे. एकप्रकारे ऑक्सीजन पार्क तयार केली आहेत, यातून निसर्गामध्ये जैव विविधता राखण्यास मदत होत आहे. त्यासोबतच जलसंधारणासाठी मशीन कामातून तलावाचे खोलीकरण यांसारखी कामे युद्ध पातळीवर सुरू आहेत.त्यासोबत शेतकऱ्यांसाठी सर्वात महत्वाचा महत्वकांक्षी प्रोजेक्ट म्हणजे ॲग्रो फ़ॉरेस्ट्री असून यामध्ये शेतकऱ्यांना मोफत फळझाडे, प्रशिक्षण आणि ३ वर्ष मार्गदर्शन याचा समावेश आहे.

शेतकऱ्याला फळझाडांच्या माध्यमातून आर्थिक सक्षम व समृद्ध करून त्याचे राहणीमान उंचावणे सोबत सोबत वातावरण बदलाप्रती खारीचा वाटा उचलणे हे संस्थेचे प्रमुख उद्दिष्ट असल्याचं राज्य समन्वयक चैतन्य जोशी यांनी यावेळी सांगितलं.

या प्रशिक्षणाला सुरूवात झाली असुन हे प्रशिक्षण पुढील दिड महिना चालणार आहे. यासाठी ९५९४२९६०६० / ९९२१४५१७१३ या नंबरवर नोंदणी करण्याचं आवाहन संस्थेच्या वतीने करण्यात आलं आहे.

# येणके येथील जलजीवन मिशनचे काम प्रगतीपथावर

- नागरिकांनी मतदानावरचा बहिष्कार मागे घ्यावा
- कराडच्या गट विकास अधिकाऱ्यांचे आवाहन

**राजदंड / कराड**

येणके, ता. कराड येथील कुंभार वस्तीसाठी जलजीवन मिशन अंतर्गत वितरण व्यवस्था व नळ जोडणी करण्याची तरतूद अंदाजपत्रकात करण्यात आली आहे. या कामातील दाबनलिकेचे काम पूर्ण झाले आहे. वितरण व्यवस्थेचे काम प्रगतीपथावर आहे.

कुंभार वस्ती येथील नागरिकांनी निवडणुकीवर टाकलेला बहिष्कार मागे घेऊन येणाऱ्या प्रत्येक निवडणुकीमध्ये मोठ्या संख्येने मतदान करावे, असे आवाहन कराड पंचायत समितीच्या गट विकास अधिकाऱ्यांनी केले आहे.

येणके येथील कुंभार वस्ती येथील योजने सद्यस्थितीची प्रगती ४० टक्के इतकी असून उर्वरित काम येत्या ४ ते ५ महिन्यात पूर्ण करण्याची दक्षता घेण्यात येणार आहे.

या योजनेद्वारे गावच्या पाणीपुरवठा विषयक समस्या कायम स्वरुपी मिटणार असल्याने कुंभार वस्तीतील नागरिकांनी निवडणुकीवर टाकलेला बहिष्कार मागे घ्यावा, असे आवाहनही कराडच्या गट विकास अधिकारी यांनी केले आहे.

# ट्रकच्या धडकेत दुचाकीस्वाराचा मृत्यू

**राजदंड / सातारा**

ट्रकच्या धडकेत एका दुचाकीस्वाराचा मृत्यू झाल्याची नोंद सातारा शहर पोलीस ठाण्यात करण्यात आली आहे.

याबाबत पोलिसांनी दिलेली माहिती अशी, सातारा शहरानजीक देगाव फाटा येथे ट्रकने पाठीमागून धडक दिल्याने रमेश लक्ष्मण सोनगी (वय ५२, रा. विजापूर) या दुचाकीस्वाराचा मृत्यू झाला. ही घटना दि. ३० ऑक्टोबर २०२३ रोजी घडली असून अपघातात ते गंभीर जखमी झाले होते. उपचारावेळी त्यांचा मृत्यू झाला. यानंतर सोनगी यांच्या भावाने उशीरा दि. १७ एप्रिल रोजी पोलीस ठाण्यात तक्रार दिली.

# शिक्षक हेच सुसंस्कृत समाजनिर्मितीचे जनक - आ. शिवेंद्रसिंहराजे

## सेवानिवृत्तीनिमित्त 'अजिंक्यतारा'च्या प्राचार्य मोरेंचा सत्कार



**राजदंड / सातारा**

समाजाच्या प्रगतीसाठी शिक्षणाशिवाय दुसरा पर्याय नाही. शिक्षणामुळेच युवा पिढी स्वतःच्या पायावर उभी राहते. त्यामुळे ज्ञानदानाचे काम करणारे शिक्षक हे सर्वांसाठीच आदर्श आहेत. शिक्षक हेच खऱ्या अर्थाने सुसंस्कृत पिढी आणि समाजनिर्मितीचे जनक आहेत, असे प्रतिपादन आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केले.

अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्याच्या कार्यस्थळावरील अजिंक्यतारा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यामंदिराचे प्राचार्य शिवानीमोरे व शाळेचे सेवक दत्तात्रय मोहिते या दोघांचा सेवानिवृत्ती सत्कार आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते करण्यात आला. याप्रसंगी आ. शिवेंद्रसिंहराजे बोलत होते. याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष यशवत साळुंखे, उपाध्यक्ष नामदेव सावत, सेक्रेटरी जिवाजी मोहिते, सदस्य रामभाऊ जगदाळे, सर्जेराव सावंत, जयवल कुंभार, कारखान्याचे सर्व संचालक, पदाधिकारी यांची प्रमुख उपस्थिती होती.

आ. शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी प्राचार्य मोरे व मोहिते यांच्या कार्याचे कौतुक केले. शाळेच्या, संस्थेच्या व विद्यार्थी हितासाठी राबवलेल्या वेगवेगळ्या योजनांचे, शाळेची शिस्त, एसएससी, एचएससी, एन एम एम एस, शिष्यवृत्ती, मंथन, शासकीय रेखा कला परीक्षा, क्रीडा स्पधोमध्ये गुणवत्ता वाढीसाठी सातत्याने केलेल्या प्रयत्नाबद्दल सर्वांचे कौतुक केले.

जिवाजी मोहिते यांनीही प्राचार्य श्री मोरे व शाळा सेवक श्री मोहिते यांच्या कार्याचा गौरव केला. ज्येष्ठ शिक्षक पांडुरंग कणसे यांनी प्रास्ताविक केले. सन्मानपत्राचे वाचन कलाशिक्षक विवेक जाधव व शिक्षिका सौ. सुदर्शना जगताप यांनी केले. प्राथमिक विद्व्द्यामंदिराचे मुख्याध्यापक शंकर पवार, शाळेतील ज्येष्ठ शिक्षक संतोष मोरे, माजी विद्यार्थी डॉ. रणजीत मोरे यांनी मनोगत व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना प्राचार्य मोरे यांनी त्यांच्या सेवापूर्व व सेवाकाळातील संघर्षपूर्ण प्रसंगांचे वर्णन केले. दत्तात्रय मोहिते यानीही आपल्या सेवापूर्व व सेवेतील काळात केलेल्या विविध वैशिष्ट्यपूर्ण कार्याचा उलगडा केला.

नेताजी ननावरे व सतीश यादव यांनी सूत्रसंचालन केले. महेश जाधव यांनी आभार मानले. कार्यक्रमास सौ. वैशाली मोहिते, धनाजी जाधव, श्रीमती जयश्री रानभरे, कु. शितल साळुंखे, सौ. नरे, संभाजी मगर, सौ. धनश्री शिदे, श्रीमती वैशाली पवार, विनोद कोळेकर, सौ. वंदना बर्गे, अविनाश घाडगे, किरण बल्लाळ, कु. रचना वानखेडे, सौ. सुरेखा कुंभार, सौ. वर्षा क्षीरसागर, सौ. तेजस्विनी पोर्तकर, शंकर वाघमारे, बंडू मोरे, श्री राजेंद्र गुरव यांच्यासह शिक्षक, विद्यार्थी आमी मित्रपरिवार उपस्थित होता.

# वाई तालुक्यात पाण्यासाठी माणुसकीचा अंत; गुंडेवाडी गावची विहीर अडचणीच्या भोवऱ्यात

## प्रशासनाची 'हाताची घडी तोंडावर बोट'

**राजदंड / वाई**

जिल्हा परिषद सातारा व वाई पंचायत समिती प्रशासनाच्या बोटचेपी धोरणाचा फटका गुंडेवाडी गावाला सहन करावा लागत असून गावाला पिण्याच्या पाण्यासाठी प्रशासनाचे उंबरे झिजवावे लागत आहे तरी प्रशासनाला घाम फुटत नाही गावाला हक्काची पाण्याची विहीर मंजूर असूनही प्रशासन अधिकाऱ्यांनी हाताची घडी तोंडावर बोट ठेवत कायदा बासनात गुंडाळून ठेवल्याने गुंडेवाडी ग्रामस्थांना तीव्र पाणीटंचाईच्या वेदना भोगायला लागत आहेत.

स्थानिक गावकीच्या गैरसमजातून गुंडेवाडी गावची विहीर अडचणीच्या भोवऱ्यात अडकली आहे का? अडकवली आहे याचे उत्तर प्रशासनाकडून गुंडेवाडी ग्रामस्थांना दोन वर्षांपासून मिळतनसल्या मुळेपुरोगामी विचारांच्या पाणीदार वाई तालुक्यात पिण्याच्या पाण्यासाठी स्वकीयांनीच माणूसकीचा अंत केल्याचे खेदजनक चित्र पहायला मिळत असल्याचे खंत गुंडेवाडी ग्रामस्थांनी व्यक्त केली मांढरदेवी व पांडवगड डोंगराच्या पायथ्याला गुंडेवाडी ग्रुप ग्रामपंचायत गेली कित्येक वर्षे पाणी टंचाईने ग्रस्त व त्रस्त आहे याचे कसलेही सोयरसुतक प्रशासना ला नाही जानेवारी ते मे-जून पर्यंत गावाला टँकरने पाणी पुरवठा केला जातो हे प्रशासनाला अवगत आहे दरवर्षी गुंडेवाडी गावाला पाण्याची टंचाई भासत असताना सुध्दा यावर निर्णायक व ठोस उपाय करण्यास जिल्हा प्रशासन व वाई पंचायत समिती अधिकारी पुर्णतः अपयशी ठरले आहेत गावच्या हद्दीत विहीर काढण्यास विरोध करणाऱ्या धावडी ग्रामस्थांचा गैरसमज दूर करण्याऐवजी प्रशासन हाताची घडी घालून गुंडेवाडी ग्रामस्थांची मजा बघण्यात धन्यता मानत आहे ही बाब अत्यंत शरमेची म्हणावी लागेल.

गुंडेवाडी ग्रामस्थांना वर्षातील सलग सहा महिने पाण्यासाठी टँकरचा आधार घ्यावा लागत आहे यातूनच जलजीवन मिशन अंतर्गत गावाला सन २०२१-२२ मध्ये सातारा जिल्हा परिषद मार्फत ३६ लाख ४० हजार ९०५ रुपयांची नळ पाणीपुरवठा योजना मंजूर करण्यात आली सदर कामास नियमानुसार प्रशासकीय मान्यता मिळून १५ नोव्हेंबर २०२२ रोजी काम करण्याचे आदेश ठेकेदाराला देण्यात आले आहेत तरी सुद्धा आज मितीला कामाची परिस्थिती जैसे थे आहे तरीही प्रशासनाला जाग येत नाही का प्रशासनाला योजनेचे काही देणे घेणे नाही.

योजनेतील पाईपलाईनचे जवळपास ७० टक्के काम पूर्ण करण्यात आले आहे परंतु योजने तील विहीर धावडी गावच्या पाझर तलावा लगत काढण्यात येत आहे परंतु पाझर तलावा लगत विहीर काढल्यास आपल्याला पाणी कमी पडेल गैरसमजातून धावडी ग्रामस्थांनी विहिर खोदण्यास विरोध करत काम बंद पाडले आहे यातून अनेकदा वादाचे प्रसंग उद्भवले ठेकेदाराच्या सर्व पाइप फोडण्यात आल्या.

वास्तविक गुंडेवाडी ग्रामस्थ विहीर खुदाई त्यांच्या हद्दीत करत असून विहीर खुदाई नंतर धावडीच्या पाझर तलावामधील जल स्तोत्रावर कुठल्याही प्रकारे परिणाम होणार नाही याबाबत भूजल सर्वेक्षण यंत्रणा विभाग सातारा ग्रामीण पाणी पुरवठा उपअभियंता वाई व जिल्हा परिषद सातारा,वाई प्रांत कार्यालय, गट विकास अधिकारी वाई पंचायत समिती व अन्य तांत्रिक प्रशासकीय विभागांनी लेखी स्वरूपात खात्री व म्हणणे दिले आहे तरी धावडी ग्रामस्थ अज्ञानातून विहिर खुदाई कामास अटकाव करत आहेत यावर प्रशासकीय यंत्रणा मूक गिळून का गप्प बसली आहे याची शहानिशा तातडीने होणे गरजेचे आहे गुंडेवाडी ग्रामस्थांनी अन्न व पाणी त्याग करण्याची वाट प्रशासन पहात आहे का?

### सावित्रीच्या लेकींचा पाण्यासाठीची पायपीट व छळवाद कधी थांबणार?



पांडवगडाच्या कुशीत वसलेल्या गुंडेवाडी गावाला कायमच पाण्याची वाणवा आहे येथील महिलांच्या वाट्याला पाण्यासाठीची भटकंती पाचवीलाच पुजली आहे प्रशासकीय मंजुरीमिळून ही अडथळे दूर करण्यास प्रशासन अधिकारी जाणीवपूर्वक चालढकल करत गुंडेवाडी ग्रामस्थ व महिलांची अवहेलना करत आहेत शासनाची टँकर मुक्त गाव ही घोषणा फक्त कोऱ्या कागदावरच दिसत असल्याने प्रत्यक्षात मात्र गुंडेवाडी ग्रामस्थ व महिलांना आयुष्यभर पाणी टंचाईचाच सामना करावा लागणार आहे का ? लोकप्रतिनिधी व प्रशासनाने याचा गांभीर्याने विचार करून मंजूर विहिरीचे काम तातडीने मार्गी लावून गुंडेवाडी ग्रामस्थांची तहान भागवावी तर पिढ्यापिढ्या गुण्यागोविंदाने एकत्रित शेजारी रहाणाऱ्या धावडी ग्रामस्थांनी गैरसमजातून ताठर भूमिका सोडून मोठया भावाची भूमिका घ्यावी.

– अश्विनी सचिन पाटणे, सरपंच गुंडेवाडी

# पहिल्या टप्प्यातील मतदानात त्रिपुरा अन् बंगालमध्ये सर्वाधिक चुरस

**त्रिपुरा :** लोकसभा निवडणुकीसाठी देशात पहिला टप्पा पार पडला. या टप्प्यात २१ राज्ये आणि केंद्रशासित प्रदेशातील १०२ जागांवर मतदान झाले. पहिल्या टप्प्यात १६०० हून अधिक उमेदवार रिंगणात आहेत. या टप्प्यात नऊ केंद्रीय मंत्री, दोन माजी मुख्यमंत्री आणि एका माजी राज्यपालांचे भवितव्य पणाला लागले आहे. सकाळी ७ वाजता सुरू झालेले मतदान सायंकाळी ६ वाजेपर्यंत सुरू होते. अरुणाचल प्रदेश आणि सिक्कीमच्या विधानसभेच्या ९२ जागांवरही आज मतदान झाले. महाराष्ट्रात लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात विदर्भातील एकूण पाच मतदारसंघात सायंकाळी पाचपर्यंत ५४.८५ मतदान झाले आहे.

निवडणूक आयोगाने दिलेल्या माहितीनुसार पहिल्या टप्प्यात १६.६३ कोटीहून अधिक मतदार

## महाराष्ट्रात काय घडले?

आहेत. यामध्ये ८.४ कोटी पुरुष आणि ८.२३ कोटी महिला मतदार आहेत. त्यापैकी ३५.६७ लाख मतदार असे आहेत जे पहिल्यांदाच मतदान करणार आहेत. तर २० ते २९ वयोगटातील मतदारांची संख्या ३.५१ कोटी आहे. यासाठी १.८७ लाख मतदान केंद्रे तयार करण्यात आली आहेत.

मतदानाला सुरुवात झाल्यानंतर सायंकाळी ५ वाजेपर्यंत पश्चिम बंगाल, त्रिपुरा ते मेघालयपर्यंत बंपर मतदान झाले. त्याचवेळी यूपी-बिहार आणि मध्य प्रदेशातील मतदारांमध्येही उत्साह दिसून आला. पहिल्या टप्प्यात पश्चिम बंगालमधील ४, यूपीमधील ८ आणि बिहारमधील ४ जागांवर मतदान होत आहे. याशिवाय तामिळनाडू (३९) आणि उत्तराखंड (५ जागा) च्या सर्व जागांवर मतदान होत आहे. आता बंपर मतदानाचा फायदा कोणाला होणार? हा प्रश्न आहे.

बंपर मतदानाचा फायदा कोणाला होतो?

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात बंपर मतदानाचा फायदा कोणाला होणार? राजकीय जाणकारांच्या मते, सर्वसाधारणपणे जास्त मतदान किंवा मतदानाची टक्केवारी वाढणे हे सत्ताधारी पक्षाविरोधातील जनक्षोभ म्हणून पाहिले जाते. सध्याचे सरकार बदलण्यासाठी लोक जास्त मतदान करतात, असे मानले जाते. उच्च मतदान टक्केवारी हे सरकार बदलाचे समानार्थी मानले जाते. मात्र, गेल्या काही निवडणुकांमध्ये हा कल बदलला आहे.

२०१४ आणि २०१९ च्या लोकसभा निवडणुकीच्या आकडेवारीवर नजर टाकल्यास, मतदानाची टक्केवारी जास्त असूनही एनडीए केंद्रात सत्तेवर परतली आहे. २०१४ मध्ये ६६.४ टक्क्यांच्या तुलनेत २०१९ मध्ये ६७.३ टक्के मतदान झाले. असे असतानाही केंद्रात भाजपची सत्ता आली. तथापि, जर आपण २००९ च्या मतदानाच्या टक्केवारीची तुलना केली तर २०१४ मध्ये जास्त मतदान झाल्यामुळे सत्ता परिवर्तन झाले. २००९ मध्ये ५८.२म च्या तुलनेत २०१४ मध्ये ६६.४म मते पडली.

**कोणत्या राज्यात किती मतदान?**

- **अंदमान आणि निकोबार: ५६.८७म**
- **अरुणाचल प्रदेश: ६३.२६म**
- **आसाम: ७०.७७म**
- **बिहार: ४६.३२म**
- **छत्तीसगड: ६३.४१म**
- **जम्मू आणि काश्मीर: ६५.०८म**
- **लक्षद्वीप: ५९.०२म**
- **मध्य प्रदेश: ६३.२५म**
- **महाराष्ट्र: ५४.८५म**
- **मणिपूर: ६७.४६म**
- **मेघालय: ६९.९१म**
- **मिझोरम: ५२.६२म**
- **नागालँड: ५५.७५म**
- **पुद्दुचेरी: ७२.८४म**
- **राजस्थान:५०.२७म**
- **सिक्कीम: ६७.५८म**
- **तामिळनाडू: ६२.०२म**
- **त्रिपुरा: ७६.१०म**
- **उत्तर प्रदेश: ५७.५४म**
- **उत्तराखंड: ५३.५६म**
- **पश्चिम बंगाल: ७७.५७म**

# पवारांचे सीतामाईच्या मूर्तीबाबतचे विधान ढोंगीपणाचे भाजपा आ. प्रवीण दरेकर यांची टीका

**अयोध्या :** अयोध्येतील मंदिरात बाल रूपातील श्री रामलल्ला विराजमान आहेत. तेथे सीतामाईंची मूर्ती का नाही अशी विचारणा करणाऱ्या ज्येष्ठ नेते शरद पवारांनी आपला ढोंगीपणा दाखवून दिला आहे, अशी टीका भारतीय जनता पार्टीचे विधान परिषदेतील गटनेते आ. प्रवीण दरेकर यांनी शुक्रवारी केली. भाजपा प्रदेश कार्यालयात झालेल्या पत्रकार परिषदेत आ. दरेकर बोलत होते. भाजपा प्रदेश मुख्यालय प्रभारी रवींद्र अनासपुरे, प्रदेश माध्यम विभाग प्रमुख नवनाथ बन, प्रवक्ते अभिषेक मिश्रा यावेळी उपस्थित होते.

आ. दरेकर म्हणाले की पवार साहेब आपण मंदिरात जात नाही, आपण धार्मिक नाही अशी शेखी मिरवत असता. धार्मिक नसलेल्या पवार यांना अयोध्येतील मंदिरात सीतेची मूर्ती का नाही याची चिंता लागावी, हे आश्चर्यजनक आहे. प्रत्येक गोष्टीत राजकारण आणण्याचा स्वभाव असल्याने त्यांच्याकडून अशी विधाने केली जात आहेत. राम मंदिर निर्मिती नंतर पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची लोकप्रियता प्रचंड वाढली आहे. हे पाहून हतबल झालेल्या पवारांनी अशा कुरापती काढणे सुरु केले आहे. आपल्या सुनेला बाहेरची म्हणून हिणवणाऱ्या पवारांना सीता माईचा कळवळा येतो, यातून त्यांना आलेले नैराश्यच दिसते आहे. राम मंदिरातील मूर्ती बालरूपातील रामलल्ला आहेत, हे माहित नसल्याने पवारांनी अशी वक्तव्ये केली आहेत.

रत्नागिरी - सिंधुदुर्ग मतदारसंघातून उबाठा गटाने कितीही बढाया मारल्या तरी भाजपा महायुतीचे उमेदवार नारायण राणे हे प्रचंड मताधिक्याने निवडून येतील, असा विश्वास आ. दरेकर यांनी व्यक्त केला. यावेळी आ. दरेकर यांनी विनायक राऊत यांच्यावर जोरदार हल्ला चढविला. राऊत यांनी १० वर्षे खासदार असताना कोकणासाठी काय केले,याचा हिशोब द्यावा, असेही ते म्हणाले. आघाडीत तीन पक्ष असल्याने जागावाटपाला थोडा वेळ लागणारच. प्रत्येकाला आपल्याला अधिक जागा मिळाव्यात असं वाटण साहजिकच आहे. आम्हा सर्वांचे लक्ष्य नरेंद्र मोदी यांना पुन्हा पंतप्रधान करण्याचे असल्याने जागावाटपाबाबत समाधानकारक तोडगा निघेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. माढा लोकसभा मतदार संघात कोणी कितीही दावे केले तरी भाजपा महायुतीचे उमेदवार रणजितसिंह नाईक निंबाळकर लाखाच्या मताधिक्याने विजयी होतील, असा विश्वास आ. दरेकर यांनी व्यक्त केला.

# आज इयत्ता बारावीचा निकाल

**पणजी :** गोवा शालान्त मंडळाने घेतलेल्या बारावी परीक्षेचा निकाल रविवार दि. २१ एप्रील रोजी होणार असल्याचे शालान्त मंडळाने जाहीर केले आहे. एकूण १७९८७ विद्यार्थ्यांनी ही परीक्षा दिली आहे.

अगोदर जाहीर केल्याप्रमाणे इयत्ता बारावी परीक्षेचा निकाल गोवा शालान्त मंडळ ह्याच महिन्यात जाहीर करणार आहे. रविवार दि. २१ एप्रील रोजी संध्याकाळी ५ वाजता गोवा शालान्त मंडळाच्या सभागृहात हा निकाल जाहीर केला जाणार आहे. शालान्त मंडळ इतिहासात पहिल्यांदाच आपल्या स्वत:च्या इमारतीत निकाल जाहीर करणार आहे. आतापर्यंत एकदाही मंडळाने दहावीचा किंवा बारावीचा निकालही आपल्या इमारतीत जाहीर केला नव्हता. कारण तशी प्रशस्त जागा शालान्त मंडळाकडे नव्हती. आता शालान्त मंडळाची स्वत:ची भव्य इमारत उभारल्यामुळे आणि त्याचा वापरही सुरू झाल्यामुळे स्वत:च्याच इमारतीत निकाल जाहीर करण्याची संधी शालान्त मंडळाला मिळाली आहे.

परीक्षा दिलेल्या एकूण १७९८७ विद्यार्थ्यांपैकी ८५५० मुले आहेत तर ९४३७ मुली आहेत. कला विभागात ४३०९ विद्यार्थी, वाणिज्य शाखेत ५३२० विद्यार्थी, विज्ञान शाखेत ५८८३ विद्यार्थी तर व्यावसायिक शाखेत २४७५ विद्यार्थी आहेत. मागील वर्षी बारावीचा निकाल हा ९५.४६ टक्के इतका लागला होता.

# अवकाळी पाऊस विदर्भ ते अरबी समुद्र सक्रीय ट्रॉफमुळे

**पणजी :** अचानक आभाळ अंधारून येवून गोव्यात सर्वत्र दीड तास कोसळलेला जोरदारपाऊसहा विदर्भ ते मध्य अरबी समुद्रातील सक्रीय ट्रॉफमुळे पडल्याचे भारतीय हवामान खात्याने म्हटले आहे. रविवारीही पावसाची शक्यता हवामान खात्याने वर्तविली आहे.मराठवाडा ते उत्तर कर्नाटक दरम्यान एक ट्रॉफ आकार घेत असलेला १६ एप्रील रोजीआढळून आला होता. भारतीय हवामान खात्याने त्याचा अलर्टही जारी केला होता.

परंतु हा ट्रॉफ पच्छिमेच्या दिशेने सरकू लागला असून तो सक्रीय बनला आहे. विदर्भ ते पूर्व मध्य अरबी समुद्रापर्यंत तो पसरला आहे.शनिवारी सकाळी पडलेला जोरदारपाऊसयाच ट्रॉफचा परिणाम आहे. रविवारीही पावसाच्या सरी कोसळण्याची शक्यताही हवामान खात्याने वर्तविली आहे. हवामान खात्याच्या डॉप्लर रडारद्वारे टीपलेल्या आकाशाच्या छायाचित्रात पेडणे, डिचोली, सत्तरी, धारबांदोडा, सांगे, फोंडा, तिसवाडी आणि सास्टी तालुक्यांवर पावसाचे ढग दिसत होते. हवेची दिशा पश्चिमेकडे राहिल्यामुळे अरबी समुद्राच्या दिशेने हे ढग जात आहेत.



# ज्वालामुखीचा उद्रेक, त्सुनामीचा इशारा; ११,००० नागरिकांना घर सोडण्याचे आदेश



**जकार्ता :** हजारो फूट उंचीवरील रुआंग पर्वतावरीलज्वालामुखीचेगेल्या २४ तासांत पाच मोठे उद्रेक झाल्यानंतर सर्वत्र राख, दगड, लाव्हारस पसरला आहे. त्यामुळे प्रशासनाने ११,००० हून अधिक लोकांना परिसर सोडण्याचे आदेश दिले आहेत. त्सुनामीचा इशाराही जारी करण्यात आला आहे.-ऋएठढखडएचएछढसुलावेसी बेटाच्या उत्तरेकडीलज्वालामुखीमध्येगेल्या २४ तासांत किमान पाच मोठे उद्रेक झाल्याचेइंडोनेशियाच्याज्वालामुखी आणि भूगर्भीय आपत्ती निवारण केंद्राने सांगितले. बुधवारी आधी किमान ८०० रहिवाशांनी परिसर सोडला होता. त्यानंतर नागरिकांचे मोठ्या प्रमाणात पलायन होत आहे.

**१२० सक्रिय ज्वालामुखी**

२७ कोटी लोकसंख्या असलेल्याइंडोनेशियात१२० सक्रिय ज्वालामुखी आहेत. ज्वालामुखीचा काही भाग समुद्रात कोसळू शकतो आणि तेथे १८७१ च्या उद्रेकाप्रमाणे त्सुनामी येऊ शकते. टॅगुलंडांग बेट पुन्हा धोक्यात आले आहे. तेथील रहिवाशांना बाहेर काढण्याचे प्रयत्न केले जात आहेत. २०१८ मध्ये झाला होता ४३० लोकांचा मृत्यू

- इंडोनेशियाच्या आपत्ती व्यवस्थापन विभागाने सांगितले की, रहिवाशांना सुलावेसी बेटावरील मॅनाडो या जवळच्या शहरामध्ये स्थलांतरित केले जाईल.

- २०१८ मध्ये इंडोनेशियाच्या अनाक क्रकाटाऊ ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे सुमात्रा आणि जावाच्या किनारपट्टीवर त्सुनामी आली. त्यात ४३० लोकांचा मृत्यू झाला होता.

# इस्रायलने अखेर बदला घेतलाच; इराणच्या शहरावर हवाई हल्ला



**तेहरान :** इराणने केलेल्या हल्ल्याचा बदला घेत अखेरइस्रायलनेइराणच्याअण्वस्त्रांचा तळ असलेल्या इस्फहान शहरावर, एअरबेस तसेच इराक आणि सीरियामध्येही हवाई हल्ले केले. ४६ देशांनी इराणवर हल्ला न करण्याची विनंतीइस्रायललाकेली होती. मात्र ती धुडकावून लावत अमेरिकेलाही न विचारात घेत हा हल्ला करण्यात आला. यामुळे तणाव वाढला आहे.-ऋएठढखडएचएछढइराणचे सर्वोच्च नेते अली खामेनेई यांचा ८५वा वाढदिवस असतानाच हा हल्ला करण्यात आला. या हल्ल्यानंतर स्फोटांचे आवाज दूरपर्यंत गेले. मात्र या हल्ल्याला इस्रायलने अद्याप दुजोरा दिलेला नाही. त्याचवेळी इराणने इस्फहानमध्ये ३ ड्रोन पाडल्याचे सांगितले आहे. यापूर्वी इराणने इस्रायलवर क्षेपणास्त्रे आणि ड्रोनने हल्ला केला होता. हा हल्ला रोखण्यासाठी फ्रान्स, ब्रिटन आणि अमेरिकेने इस्रायलला मदत केली. इराणचे ९९ टक्के हल्ले रोखण्यात आल्याचे इस्रायलने म्हटले होते. इराणच्या हल्ल्यानंतर इस्रायलने बदला घेण्याचा इशारा दिला होता. त्यानंतर हा हल्ला झाला आहे.

**इराण-इस्रायल युद्ध होणार?**

- इराणच्या हल्ल्यानंतर इस्रायलनेही प्रत्युत्तर दिले आहे. त्यामुळे दोन्ही देशयुद्धाच्याउंबरठ्यावर उभे आहेत. मात्र, सध्या तरी युद्धाची शक्यता नाही.

- इस्रायलने इराणवर मोठा हल्ला केलेला नाही. इराण आजच्या हल्ल्याचा बदला घेणार नाही. हल्ल्याचा उद्देश केवळ इराणला हानी पोहोचवणे हा नव्हता तर केवळ इशारा देणे हा होता.'एअर इंडिया'कडून सेवा स्थगित

इराण आणि इस्रायलमधील वाढत्या तणावाच्या पार्श्वभूमीवर एअर इंडिया कंपनीने इस्रायलची राजधानी असलेल्या तेल अवीवसाठीची आपली विमानसेवा येत्या ३० एप्रिलपर्यंत स्थगित केली आहे. प्रवाशांच्या सुरक्षेच्या पार्श्वभूमीवर हा निर्णय घेतल्याचे कंपनीने स्पष्ट केले.'नागरिकांनो, दोन्ही देशांतून बाहेर पडा'

ऑस्ट्रेलियाच्या परराष्ट्र मंत्रालयाने आपल्या नागरिकांना इराण, इस्रायलमधून बाहेर पडण्याचा सल्ला दिला आहे. परराष्ट्र मंत्रालयाने म्हटले की, येथे हल्ल्याचा धोका वाढत आहे. परिस्थिती आणखी बिघडण्याची शक्यता आहे.

कच्चे तेल महागले

इराण आणि इस्रायलमधील तणाव वाढल्यानंतर कच्च्या तेलाच्या दरात ४ टक्क्यांनी वाढ झाली आहे. अमेरिकी तेलाच्या किमती ३.७ टक्क्यांनी वाढून ८६ डॉलर प्रतिबॅरलवर पोहोचल्या आहेत.भावाच्या मृत्यूचा बदला घेण्यासाठी...

- इराणवरील हल्ल्यानंतर शुक्रवारी दुपारी एक व्यक्ती पॅरिसमधील इराणी वाणिज्य दूतावासात घुसली. यानंतर संपूर्ण परिसराला सुरक्षा दलांनी वेढा घातला. त्या व्यक्तीकडे स्फोटके असल्याचा संशय होता.

- मात्र, त्याच्याकडे झडती घेतली असता काहीही आढळून आले नाही. जेव्हा त्याला अटक केली जात होती तेव्हा तो फक्त म्हणत होता की, आपल्याला आपल्या भावाच्या मृत्यूचा बदला घ्यायचा आहे.आमचा हात नाही : अमेरिका

- अमेरिकेने शुक्रवारी जी-७ गटाच्या परराष्ट्र मंत्र्यांना सांगितले की, इराणमधील ड्रोन हल्ल्याबाबत इस्रायलकडून शेवटच्या क्षणी माहिती मिळाली. आमचा या हल्ल्यामागे कोणताही हात नाही.

- इटलीच्या मंत्र्यांनी ही माहिती दिली. इटलीचे परराष्ट्र मंत्री अँटोनियो ताजानी म्हणाले की, अमेरिकेने शुक्रवारी सकाळच्या सत्रात समूहाच्या सदस्य देशांच्या बैठकीत ही माहिती दिली.

# दुबईला विक्रमी पावसाचा धक्का, विमानसेवा स्थगित

**दुबई :** विक्रमी पावसाच्या धक्क्यातून अजूनही दुबई सावरलेली नाही. त्यासाठी जोरदार प्रयत्न सुरू आहेत. परंतु परिस्थिती अद्याप रुळावर न आल्याने लांब पल्ल्याची विमान वाहतूक करणाऱ्या एअर इंडिया, 'अमिराती' या कंपनीने शुक्रवारी आपली सेवा स्थगित करण्याची घोषणा केली. दुबईतील वाईट हवामानाच्या फटक्यातून विमानसेवा सुरळीत करण्याचा एका भाग म्हणून आम्ही शनिवारपर्यंत आमची सेवा स्थगित करत आहोत, असे 'अमिराती'ने एक्सवर सांगितले. फ्लायदुबई या विमान कंपनीच्या सेवेत देखील व्यत्यय आला. दुबई आंतरराष्ट्रीयविमानतळआंतरराष्ट्रीय प्रवाशांसाठी जगातील सर्वात व्यग्रविमानतळआहे. ते २४ तासांच्या आत सामान्य वेळापत्रकावर परत येण्याची आशा आहे, असे त्यांच्या सीईओंनी गुरुवारी रात्री उशिरा सांगितले. संयुक्त अरब अमिरातीसारख्या वाळवंटी प्रदेशात अत्यल्पपाऊसपडतो, परंतु हवामान तज्ज्ञ काही दिवसांपासून मोठ्या ढगफुटीचा इशारा देत होते. मंगळवारी १४२ मिलिमीटर (५.५९ इंच) पेक्षा जास्त पावसाने दुबईची तुंबई झाली. दुबई आंतरराष्ट्रीय विमानतळावरील नोंदीनुसार वर्षभरात सरासरी ९४.७ मिलीमीटर (३.७३ इंच) पाऊसपडतो.भारत म्हणतो...

संयुक्त अरब अमिरातीमधील (यूएई) भारतीय दूतावासाने दुबई विमानतळावरून प्रवास करणाऱ्या



भारतीय प्रवाशांना या आठवड्यात झालेल्या अतिवृष्टीनंतर कामकाज सामान्य होईपर्यंत अनावश्यक प्रवास टाळण्याचा सल्ला दिला आहे.

दूतावासाने सांगितले की यूएईचे अधिकारी परिस्थिती पूर्वपदावर आणण्यासाठी चोवीस तास काम करत आहेत.

# 'या' मुद्द्यावर तापलंय गोव्याचं राजकारण, कुणाचा कुणावर हल्लाबोल?

**गोवा :** लोकसभा निवडणुकीची रणधुमाळी सुरू झाली आहे. सर्वच राजकीय पक्षांनी प्रचाराचा धुरळा उडवून दिला आहे. रॅली, भेटीगाठी आणि आरोप-प्रत्यारोप सुरू आहेत. गोव्याची भूमीही आरोप प्रत्यारोपाच्या राजकारणाने तापली आहे. काँग्रेसने या निवडणुकीत रोजगाराचा मुद्दा लावून धरला आहे. तर भाजप विकासाच्या मुद्द्यावर मते मागताना दिसत आहे.

देशभरात लोकसभा निवडणुकीचं रण तापलेलं असताना गोव्यातही प्रचाराचा आणि आरोपप्रत्यारोपांचा धुरळा उडाला आहे. उत्तर गोवा मतदारसंघातून केंद्रीय मंत्री श्रीपद नाईक निवडणूक लढवत आहेत. नाईक या मतदारसंघातून पाचवेळा निवडून आलेले आहेत. त्यांचा मुकाबला माजी केंद्रीय मंत्री आणि काँग्रेस नेते रमाकांत



खलप यांच्याशी आहे. त्यामुळे जसजशी निवडणूक येत आहे, तसं तसं राजकारण तापलं आहे. या निवडणुकीत काँग्रेसने बेरोजगारीचा मुद्दा उचलला असून श्रीपाद नाईकच नव्हे तर गोव्याच्या मुख्यमंत्र्यांचीही अडचण निर्माण केली आहे. नाईक यांनी एमओपीएम विमानतळावर नोकरी देण्याचं पेरनेम येथील स्थानिकांना आश्वासन दिलं होतं. पण केंद्रात आणि राज्यात सरकार असूनही हे आश्वासन कसं पूर्ण केलं नाही, याकडे काँग्रेसने लक्ष वेधलं आहे.

पेरनेमचे तरुण एमओपीए विमानतळ सुरू झाल्याने उत्साहित होते. आपल्याला नोकऱ्या मिळेल. या ठिकाणी रोजगाराची संधी मिळेल असं त्यांना वाटत होतं. पण आता ही आशा मावळताना दिसत आहे. कारण जी आश्वासने देण्यात आली होती, ती पूर्ण झालेली नाही. केंद्र आणि राज्यात सरकार असूनही भाजपला हे आश्वासन पूर्ण करता आलं नाही, असं काँग्रेसचे उमेदवार रमाकांत खलप यांनी सांगितलं.

## खलप पराभूत करूच शकत नाही

**पेडणेकरांनी नुकताच नाईक यांना घेराव घातला होता. आता त्यांचा राग मतदानातून व्यक्त होईल, असा दावा खलप यांनी केला. तर श्रीपाद नाइक यांनी आपल्यावरील सर्व आरोप फेटाळून लावले आहेत. खलप आपल्याला पराभूत करू शकत नाही. कारण १९९९मध्येही ते अपयशी ठरले होते. ती माझी पहिलीच निवडणूक होती. त्यावेळी खलप केंद्रीय मंत्री होते. तरीही ते मला पराभूत करू शकले नाही. आताही यशस्वी होणार नाहीत, असं नाईक म्हणाले. एकीकडे काँग्रेस स्थानिकांच्या रोजगाराला निवडणुकीचा मुद्दा बनवत आहे तर दुसरीकडे भाजप विकाच्या मुद्द्यावर मतदान मागत आहे. त्यामुळे आता जनता कुणाच्यासोबत आहे हे येत्या ४ जून रोजीच कळेल.**

## मुख्यमंत्र्यांकडून पक्षपात

**यावेळी रमाकांत खलप यांनी मुख्यमंत्री प्रमोद सावंत यांच्यावर पक्षपाताचा आरोप केला आहे. सावंत यांनी आपल्या संकेलिम मतदारसंघाबाबत पक्षपात केल्याचा आरोप त्यांनी केला आहे. हा चिंतेचा विषय आहे. एमओपीए विमानतळाजवळ स्थानिक लोकांना नोकऱ्या देण्याचं आश्वासन दिलं होतं. पण मुख्यमंत्री सावंत हे संकेलिमच्या लोकांसोबत पक्षपात करत असल्याचं दिसत आहे, असा आरोप खलप यांनी केला.स्थानिक लोकांच्या एका गटाने केंद्रीय मंत्री श्रीपाद नाईक यांच्याकडे पेडणेकरांच्या मागण्या मंजूर करण्याची मागणई केली होती. पण पेडणेकरांच्या हाती अजूनही निराशाच आलेली आहे.**